रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १११
www.ramprahar.com
गुरुवार, ७ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

काँग्रेसने आत्मविश्वास गमावला -अशोक चव्हाण/२
आमदार रविशेठ पाटील यांच्या गावबैठकांना प्रचंड प्रतिसाद/५
दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दौऱ्यासाठी भारत सज्ज/८

## पीएम विद्यालक्ष्मी योजनेला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी

**नवी दिल्ली :** पैशांच्या अभावामुळे कोणत्याच विद्यार्थ्याला शिक्षण अर्धवट सोडावे लागणार नाही.




केंद्र सरकारने विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी पीएम विद्यालक्ष्मी योजना सुरू केली आहे. बुधवारी (दि.६) केंद्रीय कॅबिनेटमध्ये योजनेला मंजुरी मिळाली असून योजनेचा लाभ वर्षाला २२ लाख विद्यार्थ्यांना मिळणार आहे. पीएम विद्यालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून १० लाख रुपयांचे कर्ज सहजपणे उपलब्ध होणार आहे. सरकारी अधिसूचनेनुसार, देशातील टॉप ८६० प्रतिष्ठित उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हे कर्ज उपलब्ध होईल. ज्यात वार्षिक २२ लाख विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. लाभार्थी विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांच्या कर्जावर तीन टक्के व्याज दर असेल, ज्यांच्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न आठ लाखांपर्यंत आहे.

# लाडक्या बहिणींचे लाडके प्रशांतदादा!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रचारादरम्यान माता-भगिनींकडून जोरदार स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पनवेलमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रयत्न कामी आले. या योजनेंतर्गत महापालिका कार्यक्षेत्र व पनवेल तालुक्यात एक लाखहून अधिक महिलांना त्याचा लाभ मिळाला. त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लाडक्या बहिणींचे लाडके भाऊ अर्थात आमदार प्रशांत ठाकूर' यांना आशीर्वाद देण्यासाठी लाडक्या माता-बहिणी सरसावल्या असल्याचे चित्र पहायला मिळत आहेत.



पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून त्यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून सरकारच्या या योजनेचे जोरदार स्वागत झाले आणि त्याच पद्धतीने या योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाली. आज राज्यातील कोट्यवधी महिलांना या योजनेचा थेट फायदा झाला. ही योजना अशीच पुढे चालू राहिली पाहिजे यासाठी महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना पनवेल विधानसभा मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी महिला सज्ज झाल्याचे प्रचार रॅलीत अधोरेखित होते.

विचुंबे व पळस्पे पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या आंबिवली, वांगणी, लोणीवलीवाडी, लोणीवली, पाली, मोहाचा पाडा, मोहो, चिखले, शिवकर, उसर्ली खुर्द, देवद या गावांमध्ये झालेल्या प्रचारार्थ रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी प्रत्येक गावात जागोजागी माता-भगिनींनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे औक्षण करून स्वागत केले आणि 'पुन्हा विजयी भव' असा आशीर्वाद देतानाच लाडकी बहीण योजना पनवेलमध्ये यशस्वीपणे राबविल्याबद्दल धन्यवाद दिले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी माता बहिणी, ज्येष्ठांचा आशीर्वाद विधायक कार्य करण्यासाठी ताकद देत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी गावातील ज्येष्ठ नागरिकांना नमस्कार करून त्यांचेही आशीर्वाद घेतले. या वेळी युवकांनी जोरदार घोषणा देत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयाचा जयघोष केला. (पान २ वर..)



## कामोठ्यात शरद पवारांच्या पक्षातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी भाजपत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूरांनी केलेल्या विकासकामांवर आणि त्यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील कामोठे येथील पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये बुधवारी (दि.६) जाहीर पक्ष प्रवेश केला. त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षाची शाल

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले स्वागत

देऊन त्यांचे स्वागत केले आणि भाजप परिवारामध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

कामोठेमध्ये झालेल्या या पक्ष प्रवेशावेळी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पनवेल जिल्हा पदवीधर मतदारसंघाचे सचिव तुषार सांळुखे यांच्यासह सनी बगाडे, किरण भगत, राजाराम बनकर, हरिश्चंद्र घाग, अमित सोनावणे, सचिन पाटील, यांनी भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले.

या पक्ष प्रवेशावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, कामोठे मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, हर्षवर्धन पाटील, हरजींदर कौर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



**खालापूर :** उरण मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचाराचा शुभारंभ टाकेदेवी येथे करण्यात आला. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, राष्ट्रवादीच्या महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष उमा मुंढे, संदीप मुंढे, भाजप खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, गुळसुंदे जि.प. अध्यक्ष अविनाश गाताडे, वासांबे अध्यक्ष सचिन तांडेल, पोयंजे पं.स.अध्यक्ष प्रवीण ठाकूर, सावळे सरपंच सुनील माळी, भाताण सरपंच तानाजी पाटील, माजी उपसभापती देविदास पाटील, तानाजी खंडागळे, युवा कार्यकर्ते प्रतिक भोईर, रामचंद्र केदारी, राम गाताडे आदी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महायुतीचा दहासुत्री जाहीरनामा



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने मंगळवारपासून विधानसभा निवडणूक प्रचाराचा शुभारंभ केला. कोल्हापूरमधील जाहीर सभेत महायुती सरकारने 'केलंय काम भारी आता पुढची तयारी' अशी टॅगलाईन घेत आपला दहासुत्री जाहीरनामा प्रसिद्ध केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थित जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. लाडकी बहीण योजनेतील रक्कम वाढवण्यासह शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबरोबर वृद्धांना पेन्शन आणि शेतकरी सन्मान योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णयदेखील घेतला जाईल, असे महायुतीने जाहीरनाम्यातून सांगितले आहे.

### या आहेत घोषणा

- *लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार तसेच महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांना पोलीस दलात समावेश करण्याचे वचन*
- *शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५ हजार रुपये देणार*
- *प्रत्येक गरीबाला अन्न आणि निवारा देणार*
- *वृद्ध पेन्शन धारकांना २१०० रुपये रुपये देणार*
- *जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणार*
- *२५ लाख रोजगार निर्मिती तसेच १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये देणार*
- *४५ हजार गावांमध्ये पाणंद रस्ते बांधणार (ग्रामीण भागांत रस्ते बांधण्याचे वचन)*
- *अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५ हजार रुपये वेतन आणि सुरक्षा कवच पुरवणार*
- *वीज बिलात ३० % कपात करणार, सौर आणि अक्षय उर्जेवर भर देण्याचे वचन*

## निवडक

### पहिली विश्वसुंदरी काळाच्या पडद्याआड!

**कॅलिफोर्निया :** विश्वसुंदरी हा किताब



पहिल्यांदा मिळवणाऱ्या किकी हॅकन्सन यांचे वयाच्या ९५व्या वर्षी निधन झाले आहे. १९५१मध्ये किकी हॅकन्सन यांच्या डोक्यावर विश्वसुंदरी या बिरुदाचा मुकुट ठेवण्यात आला होता. जगातल्या पहिल्या विश्वसुंदरीने बुधवारी जगाचा निरोप घेतला आहे. कॅलिफोर्निया येथील त्यांच्या घरात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

### भाजप आमदारांचा कलम ३७०च्या प्रस्तावाला विरोध

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर विधिमंडळाच्या



अधिवेशनात मोठा गोंधळ, गदारोळ झाला आहे. अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रस्ताव पारित झाला. भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी विधेयकाला विरोध केला. उपमुख्यमंत्री सुरिंदर कुमार चौधरी यांनी विधानसभेत प्रस्ताव मांडला. सत्ताधारी असलेल्या नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने विधेयकाला पाठिंबा दिला.

## महाराष्ट्रातील जनता मतदानातून राहुल गांधींना नाकारेल -बावनकुळे



**मुंबई : प्रतिनिधी**

हरियाणातून राहुल गांधी यांना नाकारले तसेच आता महाराष्ट्रातील जनताही मतदानाच्या माध्यमातून राहुल गांधी यांना नाकारेल. राहुल गांधी हे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या विरोधात आहेत, या शब्दांत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधी यांच्या महाराष्ट्र दौऱ्यावरून हल्लाबोल केला.

ते म्हणाले की, राहुल गांधी संविधान बचावाचे ढोंग करत आहेत. काँग्रेसने बाबासाहेबांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत केले आहे. काँग्रेसला बाबासाहेबांचे विचार कधीच रुचले नाहीत. राहुल गांधी शहरी नक्षलवादाला पाठिंबा देण्यासाठीच आले आहेत. राष्ट्रविरोधी कारवाया करण्यासाठी, त्यांचे समुपदेशन करण्यासाठीच इथे आले आहेत. प्रसारमाध्यमांना तिथे जाऊ दिले जात नाही. अशा कोणत्या चर्चा तिथे होणार आहेत, ज्या तुमच्यापासून लपवून ठेवल्या जात आहेत, असा प्रश्न चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित केला.

शहरी नक्षलवादी विचारांचे लोक राहुल गांधींबरोबर आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलले ते खरे आहे. तब्बल १६५ च्या वर शहरी नक्षलवादी विचार असलेल्या संघटना, जनतेच्या मनात देशाबद्दल, समाजाबद्दल द्वेष पसरवणाऱ्या, समाजातील वातावरण गढूळ करणाऱ्या शहरी नक्षलवादी संघटना तयार करण्यात आल्या आहेत.

**लाल संविधानच का? -फडणवीस**

भारत जोडो हा समूह तयार करण्यात आला आहे. या समूहामध्ये अनेक संघटना अतिशय डाव्या विचारांच्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत, ध्येय धोरणे ही अराजक पसरवणारी यंत्रणा आहे. राहुल गांधी एक पुस्तक आपल्याला दाखवतात. संविधानाचा सन्मानच केला पाहिजे. पण लाल संविधानच का? कोणाला तुम्ही इशारा देताय? लाल पुस्तक दाखवून कोणाला इशारा देताय? संविधानाचा अर्थ असतो ऑर्डर. तुम्ही अराजकता पसरवत आहात, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## चिमुकलीवर बलात्कार; नराधम युवकाला अटक

**उल्हासनगर :** येथे एका इमारतीमध्ये वॉचमन असलेल्या व्यक्तीच्या तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी अवघ्या काही तासांतच आरोपीला अटक केली असून न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

एका रहिवाशाने वॉचमनच्या खोलीतून लहान मुलींच्या रडण्याचा आवाज ऐकला. त्यानंतर त्याने खोलीत जाऊन पाहिले असता, एक युवक तिथून पळताना दिसला. चिमुकलीच्या वैद्यकीय तपासणीत तिच्यावर बलात्कार झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर पोलिसांनी दोनच तासांत १८ वर्षीय नराधमाला बेड्या ठोकल्या.

## डोनाल्ड ट्रम्प पुन्हा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी बुधवारी (दि.६) झालेल्या मतमोजणीत रिपब्लिकन पक्षाला अमेरिकेत बहुमत मिळाले आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमत मिळाले आहे. ओहियोमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचे सदस्य शेरॉड ब्राऊन यांचा रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार बर्नी मोरेनो यांच्याकडून पराभव झाला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, आपल्या लोकांच्या भल्यासाठी आणि जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्रितपणे काम करूया.

## रूपेश म्हात्रेंसह पाच नेत्यांची 'उबाठा'तून हकालपट्टी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीकोनातून जोरदार हालचाली होत आहे. या सगळ्यादरम्यान उद्धव ठाकरे यांनी आपल्या शिवसेना पक्षातून पाच मोठ्या नेत्यांच्या विरोधात कारवाई केली आहे.

पीटीआयच्या रिपोर्टनुसार सुत्रांनी मंगळवारी सांगितले की, उद्धव ठाकरे यांनी पक्षविरोधी कारवायांसाठी पाच पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आहे.

हकालपट्टी केले माजी आमदार रूपेश म्हात्रे म्हणाले की, पक्षाने मला पद सोडण्यास सांगितले आणि मी सूचनांचे पालन केले, तरीही मला काढून टाकण्यात आले. रूपेश म्हात्रे यांच्यासह यवतमाळमधील पदाधिकारी विश्वास नांदेकर, चंद्रकांत घुगल, संजय आवारी आणि प्रसाद ठाकरे यांचा समावेश आहे. या सर्वांची सोमवारी पक्षविरोधी कारवायांसाठी हकालपट्टी करण्यात आली.

## सलग सुट्ट्यांमुळे माथेरानच्या पर्यटनाला बहर

**माथेरान : प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांचा ओघ वाढू लागला असून आठवडाभर शाळांच्या सलग सुट्टीमुळे माथेरान पर्यटनस्थळावर दररोज पर्यटकांची गर्दी होताना दिसत आहे. रिसॉर्ट, हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट पर्यटकांनी गजबजलेली दिसत आहेत.



आशिया खंडातील सर्वांत लहान पण टुमदार पर्यटनस्थळ म्हणून माथेरानची ओळख आहे. मोटार वाहनांना बंदी असल्यामुळे वाहन वर्दळीचा प्रश्नच नाही हॉर्नचा कर्कश आवाज नाही, कुठेच प्रदूषण नाही. एक प्रदूषणमुक्त मुक्त पर्यटनस्थळ म्हणून माथेरान नावारूपाला आले असल्याने पर्यटक माथेरानला पसंती देतात. इतर पर्यटनस्थळांपेक्षा आपला वेगळा ठसा या पर्यटनस्थळाने उमटवला आहे. घनदाट उंच झाडी, लाल मातीचे रस्ते ही माथेरानची खरी ओळख. अमेझॉनच्या जंगलाची प्रचिती येते असे घनदाट जंगल. या पर्यटनस्थळावर फिरण्याचा एक वेगळा अनुभव पहावयास मिळतो त्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर येथे भेट देतात.

पावसाळ्यामध्ये पर्यटकांनी माथेरानला तुफान पसंती दिली होती. तशीच पसंती हिवाळी पर्यटन हंगामामध्ये पहावयास मिळेल अशी चिन्हे आहेत. (पान २ वर..)

### मिनिट्रेनचे स्वागत

नेरळ-माथेरान मिनिट्रेन प्रवासी सेवा बुधवारी (दि.६) सुरू झाली. स्थानिकांनी आणि पर्यटकांनी याचे स्वागत केले. नेरळ-माथेरान मिनिट्रेन सुरू झाल्यामुळे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत नक्कीच भर पडणार असे येथील स्थानिकांमधून बोलले जात आहे. अमनलॉज-माथेरान शटल सेवासुद्धा हाऊसफुल धावत आहे. मिनिट्रेनमुळे येथील पर्यटन बहरत आहे, असे माथेरानकरांचे म्हणणे आहे.

*माथेरानचे पर्यटन दिवसेंदिवस बहरत आहे. पावसाळी हंगामात मोठ्या संख्येने पर्यटक आले होते तसेच पर्यटक आतासुद्धा आले आहेत. सर्व दुकानदार इमानेइतबारे पर्यटकांना सेवा देत आहेत. पर्यटक वाढण्याचे मोठे कारण म्हणजे माथेरानकरांची इमानदारी आणि दुकानदार आणि रेस्टॉरंटवाल्यांची सेवा या दोन गोष्टी कारणीभूत ठरत आहेत.*

**-राजेश चौधरी,** अध्यक्ष, व्यापारी वेल्फेअर असोसिएशन

## कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी रायगड जिल्ह्यातील सातही मतदारसंघात कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच निर्भय व मुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी प्रभावी पोलिसिंग करावे, अशा सूचना पोलीस निवडणूक निरीक्षक स्वप्नील ममगाई यांनी दिल्या.



रायगड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने निवडणूक तयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृह येथे झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, निवडणूक निरीक्षक संतोष कुमार राय, दुलीचंद राणा, सतीश कुमार एस, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, नवी मुंबई पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रविकिरण कोले यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आगामी निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात पुरेसे मनुष्यबळ तैनात ठेवावे. त्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करावा. (पान २ वर..)

# विधानसभा निवडणुकीसाठी एक लाखांहून अधिक मतदान केंद्र

## मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी केंद्रांमध्ये वाढ




**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगामार्फत राज्यभरात एक लाख ४२७ मतदान केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून राज्यात मतदान केंद्रांचे सुसुत्रीकरण करण्यात आले आहे. राज्यात सर्वाधिक मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहे. पुण्यात आठ हजार ४६२ मतदान केंद्र आहेत. त्यानंतर मुंबई उपनगर येथे सात हजार ५७९, ठाणे सहा हजार ९५५, नाशिक चार हजार ९२२ तर नागपूर येथे चार हजार ६३१ मतदान केंद्र आहेत.

निवडणूक आयोगाने शहरी भागातील मतदाराची अनास्था विचारात घेऊन गृहनिर्माण संकुलात मतदान केंद्र उभारली आहेत, तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागातील मतदारांना मतदान केंद्राच्या जवळ लवकरात लवकर पोहोचावे यासाठी मतदान केंद्राची संख्या वाढवली आहे.

महाराष्ट्रातील २४१ विधानसभा मतदारसंघात मुख्य आणि सहायक मतदान केंद्रांची संख्या निश्चित केली आहे. यंदा राज्यात मुख्य मतदान केंद्र ही एक लाख १८६ असून त्यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ इतकी मतदान केंद्र संख्या राहणार आहे. सहायक मतदान केंद्रांची संख्या २४१ इतकी आहेत. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यामुळे मतदारांची सोय आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित होईल. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रात पोहचता यावे यासाठी बऱ्याच ठिकाणी आवश्यक रॅम्पचीदेखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

◆ **सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्येही मतदान केंद्र**

*शहरी भागांमध्ये जसे की मुंबई, पुणे, ठाणेसारख्या शहरामध्ये अतिउंच इमारती आणि सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये एक हजार १८१ मतदान केंद्र उभारण्यात आले आहे, तसेच झोपडपट्टीमध्ये २१० मतदान केंद्र उभारण्यात आले आहे.*

◆ **नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पारदर्शकता**

*निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेला अधिक सुलभ आणि पारदर्शक बनवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये मतदार आपले मतदान केंद्र शोधण्यासाठी ऑनलाइन पोर्टल आणि मोबाइल ॲप्स वापरू शकतात. मतदार जागरूकता मोहिमेंतर्गत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मतदारांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील.*

यंदाच्या निवडणुकीत आदिवासी मतदारसंघ आणि दुर्गम भागांतील मतदारांसाठी विशेष सुविधा देण्यावर भर दिला आहे. गडचिरोली, गोंदिया, नंदुरबार, धुळे, आणि अमरावती जिल्ह्यात जेथे आदिवासी आणि दुर्गम भाग आहेत तेथे मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने मतदार सुविधांमध्ये सुधारणा केली आहे, जसे की मतदार सहाय्य केंद्रे, मतदार हेल्पलाईन आणि सूचनाफलक यांचा समावेश आहे. तरुण मतदार, महिला मतदारांना लक्षात ठेवून हे उपाय योजले आहे.

# काँग्रेसने आत्मविश्वास गमावला आहे -खासदार अशोक चव्हाण



**मुंगई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील काँग्रेसकडून तेलंगणामधील कामगिरीवर महाराष्ट्रात मते मागितली जात आहेत. महाविकास आघाडीकडून एक जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यात तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांचा फोटो लावण्यात आला आहे. महाविकास आघाडीच्या जाहिरातीत महाराष्ट्रातील नेत्यांचे फोटो नाहीत. काँग्रेसने आत्मविश्वास गमावला असून, जाहिरातीत पराभूत मानसिकतेचे लक्षण दिसते, अशी टीका भाजप खासदार अशोक चव्हाण यांनी केली.

तेलंगणामधील परफॉर्मन्सवर तुम्ही महाराष्ट्रात कशी मते मागितली जाऊ शकतात. तेलंगणा सरकारची कामगिरी महाराष्ट्रात कशी दाखवली जाऊ शकते. महविकास आघाडीच्या जाहिरातीत प्रकाशकाचे नाव दिसत नाही, यावर निवडणूक आयोगाने कारवाई करणे गरजेचे आहे. भाजपाने याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. तेलंगणामधील अनेक योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक जाहीर केलेल्या योजनांचे पूर्ण पैसेही मिळालेले नाही. काहींना अर्धेच पैसे मिळाले आहेत. तेलंगणा काँग्रेसने अनेक आश्वासने दिली होती, पण ते ती आता पूर्ण करू शकत नाहीत. तेलंगणाचे सरकार जे आश्वासने पूर्ण करू शकत नाही. काहीच कामगिरी नाही, त्यांच्या जीवावर महाराष्ट्रात मते मागणे हा प्रकार अगदी हास्यास्पद आहे, या शब्दांत खासदार अशोक चव्हाण यांनी हल्लाबोल केला.

महाविकास आघाडीकडून अशाप्रकारे चुकीचे नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मतदारांनी फेक नरेटिव्हच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन अशोक चव्हाण यांनी केले, तसेच बहुमताने महायुतीचे सरकार पुन्हा एकदा राज्यात स्थापन होईल, असा विश्वास खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला.

दरम्यान, महाराष्ट्रात गुंतवणूक वाढेल तर त्याला विरोध कशाला, कुणाचा हवा. लोकांसोबत चर्चा केली की, विरोध मावळतो. उद्धव ठाकरेंनी पॉलिटिकल स्टेटमेंट यावरून करू नये. मी राज्यसभेवर आहे. माझी अजून सहा वर्षे टर्म आहे. राज्यसभेत आनंदी आहे. मग लोकसभेत कशाला जाऊ, माझी मुलगी लढते आहे, मी ही लढावे, मला संयुक्तिक वाटत नाही. संजय राऊत आपण एका पक्षाचे प्रवक्ते आहात, वैयक्तिक पातळीवर न जाता आरोप प्रत्यारोप करावे. जो शिमगा सुरू आहे मतदार याला पसंती देणार नाही, असा खोचक पलटवार खासदार अशोक चव्हाण यांनी केला.

# सत्तेत समान वाटा असेल तरच काम करणार -महेंद्र घरत

**काँग्रेसची नाराजी कायम**




**उरण : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यात काँग्रेसला एकही जागा सोडण्यात आली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे. भविष्यात आम्ही महाविकास आघाडीचे घटक पक्ष म्हणूनच काम करणार आहोत, मात्र जो पक्ष आम्हाला सत्तेत समान वाटा देईल, त्या पक्षालाच आम्ही सहकार्य करू, असे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी जाहीर केले.

उलवे नोड, शेलघर येथे बुधवारी (दि.६) काँग्रेसच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी पक्षाचे जिल्हाप्रभारी श्रीरंग बरगे यांच्यासह जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये काँग्रेसला एकही जागा न दिल्याने काँग्रेसमध्ये कमालीचा असंतोष खदखदत आहे. यामुळेच काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. रायगडात काँग्रेसची मते ही निर्णायक असून पक्षश्रेष्ठी खासकरून जिल्हाध्यक्ष काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. या वेळी घरत यांनी, वरिष्ठ पातळीवरून जोपर्यंत लेखी स्वरूपात नक्की महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? हे पक्षाच्या पत्रावर लिहून येत नाही, तोपर्यंत आम्ही कुठल्याही प्रकारे निवडणुकीत सहभागी होणार नाही, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.

## पूर्वपिठीकीचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रकाशन

**रायगड** : प्रसिद्धी माध्यम कक्षनिर्मित रायगड-अलिबाग पूर्वपिठिका-२०२४ निवडणूक काळात निवडणूक अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकारांसाठी अत्यंत मार्गदर्शक असल्याचे मत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी व्यक्त केले. निवडणूक काळात ही पुस्तिका तयार केल्याबद्दल प्रसिद्धी माध्यम कक्षाचे कौतुक केले.

या वेळी निवडणूक निरीक्षक संतोष कुमार राय, दुलीचंद राणा, सतीश कुमार एस., पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, नवी मुंबई पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रविकिरण कोले यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# श्रीवर्धन मतदारसंघाला विकासाच्या उंचीवर पोहचवणार -ना. आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**



महायुतीच्या सरकारने सर्वसामान्य नागरिकांसाठी अनेक योजना यशस्वीरित्या राबविल्या आहेत. अनेक योजना राष्ट्रवादी पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात असून नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी राष्ट्रवादी पक्षाचा जाहीरनामा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली श्रीवर्धन मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलत आहे. त्यामुळे आगामी काळात या मतदारसंघाला राष्ट्रवादी काँग्रेस प्रगतीच्या शिखरावर पोहचवेल, असे आश्वासन महायुतीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांनी दिले.

रोह्याच्या राम मारुती चौकात पक्षाच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन त्यांचे हस्ते झाल्यानंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. या वेळी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, तालुकाध्यक्ष विनोद पाशीलकर, शहाराध्यक्ष अमित उकडे, महिला आघाडी तालुकाध्यक्षा प्रीतम पाटील, शहर अध्यक्षा प्राजक्ता चव्हाण, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, अहमद दर्जी, महेश कोलटकर, मयूर पायगुडे, नितीन पिंपळे, अमित मोहिते, चंद्रकांत पार्टे, निलेश शिर्के, माज सवाल, स्वप्नील धनावडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

विधानसभा निवडणूक प्रचाराला आता सर्वच राजकीय पक्ष मैदानात उतरले आहेत. प्रचारची सुरुवात करताना मतदार जनतेला आश्वस्त करण्यासाठी जाहिरानामे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी बारामती, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रदेश कार्यालय मुंबई, कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी गोंदिया येथे केले. राज्यभर पक्षाचे विविध मान्यवर नेते, मंत्री यांनी आपापल्या मतदारसंघात एकाच वेळी केले. त्याच धर्तीवर श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात उमेदवार आदिती तटकरे यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# जेएनपीए आम्र महामार्ग पथदिव्यांनी उजळला



**उरण : प्रतिनिधी**

ऐन दिवाळीत उरणला व जेएनपीटी बंदराला जोडणाऱ्या जेएनपीए ते पळस्पे व आम्र मार्ग या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरील अनेक ठिकाणीचे पथदिवे बंद असल्याने महामार्गावर अंधार पसरला होता. याची दखल घेत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून यात सुधारणा करण्यात आली आहे. उरणला जोडणाऱ्या जेएनपीटी ते आम्रमार्ग हा राष्ट्रीय महामार्ग पुन्हा एकदा उजळला आहे.

राष्ट्रीय महामार्ग असल्याने या मार्गावरून वेगाने धावणाऱ्या जड व प्रवासी वाहनांमुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय) ने येथील पथदिवे दुरुस्त करण्याची मागणी वाहनचालक व नागरिकांनी केली होती.

उरण ते नवी मुंबई तसेच पनवेल व पुणे या मुख्य शहराना जोडणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गाच्या उभारणीमुळे येथील प्रवास सुखकर झाला आहे.

# पनवेलमध्ये होणार उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक २०२४ साठी पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण १३ उमेदवार निश्चित झाले आहेत. या उमेदवारांनी निवडणूक खर्चासाठी दैनंदिन हिशोबाकरिता नोंदवही लिहिण्याच्या सूचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी दिल्या आहेत. निवडणूक खर्च निरीक्षक रमेश कुमार (भा. रा.से.) हे या उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी करणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

ही तपासणी १०, १४ व १८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १.३० वा. दरम्यान होणार आहे. तपासणी करण्याकरिता महानगरपालिका मुख्यालय सभागृह कक्ष याठिकाणी निवडणूक खर्च संनियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. तपासणीवेळी उमेदवाराने आपले खर्च रजिस्टर विहित पद्धतीने सादर न केल्यास त्यांचेवर पुढील कार्यवाही केली जाईल, अशा सूचना दिल्या आहेत.

या नोंदवहीत दैनंदिन खर्च नोंदविणे अत्यावश्यक आहे. वेळापत्रकाप्रमाणे उमेदवारांनी स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत खर्च नोंदवही, निवडणूक खर्चासाठी उघडलेली स्वतंत्र बँक खाते पासबूक, निवडणूक खर्चाची प्रमाणके व उपप्रमाणके, रोख रक्कम तपशील इत्यादी व निवडणूक खर्चाशी सबंधित इतर अनुषंगिक कागदपत्रे खर्च निरीक्षकांसमोर तपासणीकरिता सादर करणे बंधनकारक आहे. नियोजित दिवशी सर्व उमेदवारांनी आपले निवडणूक खर्चविषयक लेखे निवडणूक खर्च निरीक्षकांसमोर सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# फडके नाट्यगृहामध्ये रंगभूमीचे पूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राठी रंगभूमी दिनानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेच्या वतीने रंगभूमीचे पूजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मंगळवारी (दि.५) करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजनाने झाली. त्यानंतर वर्सेटाइल सिंगर मुकेश उपाध्ये आणि गणेश भगत यांनी बहारदार गिते सादर केली. आदित्य उपाध्ये आणि जोशी यांनी तबला-पेटी जुगलंदी सादर केली, तर क्षितिज गायकवाड यांनी एकपात्री अभिनय करून दाखवला. या वेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह शामनाथ पुंडे, अमोल खेर, गणेश जगताप, भाजपचे सांस्कृतिक प्रकोष्ट उत्तर रायगडचे संयोजक अभिषेक पटवर्धन यांच्यासह मोहन हिंदुपूर, प्रशांत सदावर्ते, स्मिता पुंडे, प्राची देशपांडे, प्रणव शेडगे, संचिता कोळी, श्वेता कांबळे, अनामिका कांबळे, सोहन शिर्के, परीन मोरे, सौभाग्य पिल्ले, आर्यन अन्सारी, प्रियांशू मोरे, जानवी नेले हे रंगकर्मी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रवीण मोहकर यांनी केले.



पान १ वरुन

## लाडक्या बहिणींचे लाडके प्रशांतदादा!

या रॅलीला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते वामनशेठ वाघमारे, चाहुशेठ म्हात्रे, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा कमला देशेकर, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, देवद ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद वाघमारे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, माजी सरपंच किशोर सुरते, माजी सरपंच बळीराम पाटील, माजी सरपंच अमिता म्हात्रे, मुकेश भगत, मच्छिंद्र पाटील, विश्वजीत पाटील, अविनाश गायकवाड, कामगार नेते रवींद्र नाईक, सतीश मालुसरे, संदीप वाघमारे, निलेश वाघमारे, प्रवीण पालव, संतोष शेळके, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, समिना साठी, प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## सलग सुट्ट्यांमुळे माथेरानच्या पर्यटनाला बहर

दिवाळीची सुट्टी पडताच पर्यटकांचा ओघ हळूहळू माथेरानकडे वाढू लागला आहे. शुक्रवारपासून पर्यटक येणास सुरुवात झाली असून त्यांचा ग्राफ दिवसेंदिवस वाढत आहे. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर पर्यटकांचा ओघ माथेरान मध्ये वाढू लागला आहे. मधल्या दिवसांतदेखील पर्यटक मोठया संख्येने माथेरान मध्ये दाखल झाले आहेत.

टॅक्सी संघटनेची पर्यटकांना माथेरानमध्ये आणण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. कुली, हातरीक्षावाले, घोडेवाले यांची धावपळ सुरू झाली असून हॉटेल, रेस्टॉरंट फुल दिसत आहे इतकेच काय तर लॉजिंगसुद्धा हाऊसफुल्ल दिसत आहे.

## कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना

मतदान केंद्रावर जाताना व येताना पोलिंग पार्टी रवाना होतील तेव्हा त्यांच्याबरोबर पोलीस कर्मचारीदेखील असावे. जिल्ह्यात निवडणूक आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सर्व अंमलबजावणी संस्थानी त्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य प्रामाणिकपणे बजावाव्या, असेही ममगाई यांनी या वेळी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रियेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून कार्य करावे, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

बैठकीदरम्यान संवेदनशील मतदान केंद्राबाबत चर्चा करण्यात आली. निवडणुकीच्या पूर्वतयारीचे सर्व घटक तपासण्यात आले व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा पोलीस अधिक्षक घार्गे यांनी जिल्ह्यात पोलीस व्यवस्थेचा आढावा सादर केला.

# बाबा सिद्दिकी हत्याप्रकरणी आणखी एकाला अटक

**मुंबई :** माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणी आणखी एका आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपी कुख्यात लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोलच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले आहे. बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात गुन्हे शाखेने गौरव विलास आपुणे (वय २३) याला अटक केली आहे.

आरोपी कर्वेनगर, पुणे येथील रहिवासी आहे. हल्ल्याच्या कटात त्याचा सहभाग असल्याचे तपासात उघड झाले आहे. फरार आरोपींनी त्याला शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षणही दिले होते. यापूर्वी मुंबई पोलसांनी या प्रकरणात ३२ वर्षीय सुजीत सिंह याला अटक केली होती. त्याने परदेशातील गुंडाशी संपर्क साधला होता. सिंह याने विविध समाज माध्यमांतून अनेक खात्यांद्वारे त्याच्याशी संवाद साधला. तो परदेशातील गुंड अनमोल बिष्णोई असल्याचा संशय आहे.

## निवडक

### दिवाळीनिमित्त दिव्यांची भेट



**पनवेल :** ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून मातीचे दिवे वाटप करून दिवाळी साजरी करण्यात आली. मातीचे दिवे वाटप नेरूळ येथे वाटप करण्यात आले. सर्व नागरिकांनी या वेळी प्रतिसाद दिला.

### लीना गरड यांच्या प्रचारार्थ बैठक

**पनवेल** : मविआच्या उमेदवार लीना गरड यांच्या प्रचारार्थ पनवेल मतदारसंघामधील सर्व शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेना व युवतीसेना पदाधिकाऱ्यांची बैठक खारघर येथे पार पडली. या वेळी शिवसेना उपनेते तथा निवडणूक मुख्य समन्वयक विजय कदम, निरीक्षक अनिल चव्हाण, निरीक्षक संदीप भालेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, उपजिल्हा संघटक प्रशांत अनगुडे, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर संघटक शशिकांत डोंगरे, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### सजग रहो, मतदान करो अभियान

**कळंबोली :** पनवेलमधील श्री विरूपाक्ष महादेव मंदिर ट्रस्ट आणि सजग रहो अभियान यांचेतर्फे शुक्रवारी (दि.८) गोखले हॉल येथे मतदार जागृतीकरीता एक जाहीर व्याख्यान आयोजित केले आहे. हिंदू जगे तो विश्व जगेगा या विषयावर बोलण्यासाठी वक्ते म्हणून उत्कृष्ट वक्ते, लेखक दीपक करंजीकर हे उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानामध्ये पनवेलकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अभियानचे सदस्य राकेश फाटक यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

### आदिवासींसोबत भाऊबीज साजरी

**पनवेल** : आदर्श सेवाभावी संस्थाचे संस्थापक-अध्यक्ष गजानन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ओवे कॅम्प गावाजवळील गोलवाडी (कातकरी) आदिवासी वस्तीतील महिला आणि मुलांसमवेत भाऊबीज साजरी करण्यात आली. या वेळी पनवेल महापालिकेच्या खारघर प्रभाग सहाय्यक आयुक्त स्मिता काळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या वेळी महिलांना साडी-चोळी, फराळ, मिठाई तसेच गावातील मुलांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. निवृत्त बँक व्यवस्थापक गणेश पेडामकर, आदर्श संस्थोचे सचिव मेघनाथ ठाकूर, खजिनदार संतोष राठोड, दि. विनायक पाटील सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मनेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते कुणाल ठाकूर आदींसह आदिवासी बांधव उपस्थित होते.

# पनवेल-कर्जत कॉरिडॉर बोगद्यात रूळाचे काम

## ◆ मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील ठरणार सर्वांत लांब बोगदा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ते कर्जतदरम्यान नवीन लोकल ट्रेन कॉरिडॉरच्या बोगद्यात रूळ टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. कर्जत-पनवेल रेल्वे प्रकल्प हा मुंबईच्या अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट ३च्या अंतर्गत येतो आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनद्वारे त्याची अंमलबजावणी केली जात आहे. या प्रकल्पाचे काम सध्या ५६ टक्के पूर्ण झाले असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे.

या प्रकल्पात पाच स्थानकांसह नवीन मार्गाची लांबी सुमारे २९.६ किमी आहे. संपूर्ण मार्गावर तीन बोगदे असून दोन रेल्वे उड्डाणपूल, ४४ मोठे आणि छोटे पूल, १५ पुलांखालील रस्ते आणि सात रस्त्यावरील पूल असणार आहेत. तसेच डिसेंबर २०२५पर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत या बोगद्यांमध्ये दोन किमी लांबीच्या बोगद्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. हा संपूर्ण मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील सर्वांत लांब बोगदा आहे.

कर्जत-पनवेलदरम्यान असलेली सध्याची मार्गिका माल आणि काही मेल एक्सप्रेस गाड्यांसाठी वापरली जाते, तसेच नवीन डबल लाईन कॉरिडॉरमुळे मुंबई ते कर्जतदरम्यान पनवेलमार्गे लोकल गाड्या चालवता येणार असल्याची माहिती मिळत आहे. पनवेल ते कर्जतदरम्यान नवीन लोकल ट्रेन कॉरिडॉरच्या बोगद्यात रूळ टाकण्याच्या कामासोबतच सार्वजनिक आश्रय क्षेत्र, एक बोगदा नियंत्रण प्रणाली, प्रकाशव्यवस्था, अग्निशामक यंत्रणा, वायुविजन प्रणालीचे कामदेखील सुरू करण्यात आले आहे.

हा प्रकल्प डिसेंबर २०२५पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या प्रकल्पामध्ये पनवेल, मोहोपे, चिकले चौक, कर्जत ही स्थानके असून हा सर्वांत मोठा बोगदा आकाराला येत आहे.



# पळस्पे फाटा येथे रोख रक्कम जप्त



**पनवेल : वार्ताहर**

पळस्पे फाटा येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४साठी करण्यात आलेल्या तपास कारवाईमध्ये तीन लाख ४९ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील आचारसंहिता पथकांतर्गत भरारी पथकाने मंगळवारी (दि.५) सकाळी ९.५५ वा.चे दरम्यान मुंबई-गोवा हायवे येथील पळस्पे फाटा चेक नाका येथे सुपरकॅरी टेम्पो (एमएच ४६ बीएम ८६२०)थांबवून तपासणी केली असता त्या गाडीमध्ये २,४९,५०० रुपये रोख रक्कम आढळली. ही रक्कम संशयास्पद असल्याने भरारी पथकामार्फत जप्त करण्यात आली आहे.

या कारबाई वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय पाटील, आचारसंहिता पथक प्रमुख भारत राठोड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संदिप कराड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संजय भालेराव, सहाय्यक खर्च निरिक्षक, विजय फासे, सहाय्यक खर्च निरिक्षक, संजय आपटे, आचारसंहिता पथक प्रमुख महेश पांढरे, आचार संनियंत्रण अधिकारी, शरद गिते, आचारसंहिता पथक सहाय्यक प्रमुख जी. एस. बहिरम, सहाय्यक समन्वयक आचारसंहिता कक्ष, दिनेश भोसले, तुषार म्हात्रे, नितेश चिमणे, आशा डोळस, तसेच भरारी पथक -१चे प्रमुख लक्ष्मण जाधव, सहाय्यक पथक प्रमुख सचिन पवार, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दौलराव माने, हवालदार राम म्हात्रे, कामोठे पोलीस ठाण्याचे शिपाई गणपती पाटील, खारघर पोलीस ठाण्याचे भूषण चौधरी उपस्थित होते.



**खारघर :** पनवेल विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीतील भाजपचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचाराचा जोर कायम आहे. त्या अनुषंगाने भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी खारघर भाजप प्रभाग-४मधील कार्यकर्त्यांशी संवाद साधला.





**पनवेल :** विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी कळंबोली प्रभाग ८मधील महायुतीचे सर्व कार्यकर्ते सोसायटीमध्ये जाऊन प्रचार करीत आहेत. या प्रचारासाठी माजी नगरसेवक बबन मुकादम, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, प्रियंका पवार, श्रीकांत ठाकूर, प्रभागाचे अध्यक्ष प्रकाश शेलार, शिवसेनेचे शहरप्रमुख तुकाराम सरक, सचिन मोरे, आजिनाथ जायभाय, दिनेश शर्मा, सतीश घरवाढवे, राजेंद्र बागुल, शरद वाडेकर, आरपीआयचे नवीन सोनवणे, सर्व सेक्टरप्रमुख, बुथ अध्यक्ष व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# खारघरमध्ये भाजपची वाढती ताकद शेकापसाठी धोका

## ◆ बाळाराम पाटील घटक पक्षांवर अवलंबून

**पनवेल : वार्ताहर**

खारघर ग्रामपंचायतीमध्ये एकहाती सत्ता असलेल्या शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल महापालिका निवडणुकीत पानिपत झाले. त्यात शेकापचे माजी आमदार विवेक पाटील कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणात अडकले. दरम्यान, पनवेल महापालिका निवडणुकीत पराभव होताच शेकापचे बहुतांश कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल झाल्यामुळे खारघरमधून शेकाप हद्दपार झाल्याचे चित्र आहे.

आता विधानसभा निवडणुकीत शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांना महाविकास आघाडीतील घटक पक्षावर अवलूंबन रहावे लागणार आहे.

खारघर शहराची निर्मिती होत असताना खारघर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामपंचायत हद्दीतील गावात नागरी सुविधा पुरविल्या जात असत. हळूहळू खारघर गावाचे शहरात रुपांतर झाले. खारघर ग्रामपंचायत पनवेल तालुक्यातील सर्वात श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळखली जात होती.

खारघर ग्रामपंचायतीकडून झालेले नित्कृष्ट दर्जाचे काम तसेच खारघर ग्रामपंचायतीत झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा नागपूर अधिवेशनात गाजला. या संधीचे औचित्य साधून माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये कार्यकर्ते जोडण्याचे काम केले, तसेच खारघरमध्ये मॅरेथॉनच्या माध्यमातून घराघरांत पोहोचून पनवेल महापालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत शेकापचा दारुण पराभव केला. त्यानंतर शेकाप सावरला नाही.

दरम्यान पनवेल महापालिका निवणुकीत पराभूत झालेले शेकापचे माजी सरपंच संजय घरत, गुरुनाथ गायकर, सीमा रमेश खडकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

एक लाख मतदार असलेल्या खारघर वसाहतीत शेकापचे अशोक गिरमकर, संतोष तांबोळी, दिलीप ठावूर, अजित अडसूळ, मुर्बी गावातील माजी राजिप सदस्य राम करावकर आदी बोटावर मोजण्यासारखे कार्यकर्ते खारघरमध्ये असून, गेल्या सहा-सात वर्षांत भाजपने खारघरमध्ये कार्यकर्त्यांची मोठी फौज तयार केली आहे.

काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शेकापचे उमेदवार बाळाराम पाटील यांना महाविकास आघाडीतील घटक पक्षावर अवलूंबन रहावे लागणार आहे.

# पनवेल मनपातर्फे खारघरमध्ये स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार बुधवारी (दि.६) खारघरमध्ये उत्सव चौक ते तवा हॉटेल दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी रस्त्याच्या दुतर्फा असणारा कचरा, राडारोडा, झाडांच्या वाळलेल्या फांद्या, गवत काढून साफसफाई करण्यात आली.

महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग 'अ' खारघरमध्ये उत्सव चौक हा मुख्य चौक असून येथील स्वच्छता राखण्याबाबत आयुक्तांनी प्रभाग समिती खारघरला निर्देश दिले होते. या निर्देशानुसार उत्सव चौकापासून ते तवा हॉटेल यादरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेंतर्गत घनकचरा व स्वच्छता विभागाच्या वतीने रस्त्याच्या दुतर्फा असणारा कचरा, राडारोडा, झाडांच्या वाळलेल्या फांद्या, गवत काढून साफसफाई करण्यात आली.

याआधी मागील आठवड्यात रस्त्याच्या दुसऱ्या बाजूची साफसफाई करण्यात आली होती. या स्वच्छता मोहिमेसाठी सहाय्यक आयुक्त स्मिता काळे व प्रभावी अधिक्षक जितेंद्र मढवी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**आयुक्तांच्या सूचनेनुसार उत्सव चौक ते तवा हॉटेल परिसरातील व्यावसायिकांनी, हॉटेलधारकांनी, दुकानदारांनी आपला कचरा टाकण्यासाठी स्वतंत्रपणे कचरापेट्या ठेवणे बंधनकारक आहे. आस्थापनांनी आपला कचरा रस्त्यावर टाकल्यास कारवाई करण्यात येईल.**

**-स्मिता काळे, सहाय्यक आयुक्त, खारघर प्रभाग अधिकारी**



### उलवे सिलिंडर स्फोटप्रकरणी दुकान मालकाविरूद्ध गुन्हा

**पनवेल** : उलवे, सेक्टर-१७मधील जावळे गावातील श्री हनुमान सुपर मार्केटमध्ये ३० ऑक्टोबर रात्री सिलिंडरचा स्फोट होऊन चौघांचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला होता. या घटनेतील मृत रमेश भाटी याने त्याच्या किराणा दुकानामध्ये विक्रीसाठी अवैधरित्या आणि बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेला पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरचा साठा निष्काळजीपणे हाताळला. परिणामी या ठिकाणी आग लागून सिलिंडरचा स्फोट होऊन सदर दुर्घटना घडल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात आढळून आले आहे. त्यामुळे उलवे पोलिसांनी या दुर्घटनेतील मृत किराणा दुकानमालक रमेश भंवरलाल भाटी (४५) याला जबाबदार धरुन त्याच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# पनवेलमध्ये महायुतीच्या प्रचार रॅलीला भरघोस प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूरांच्या प्रचाराचा धुरळा उडत आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते ताकदीने प्रचार करीत आहेत. त्या अनुषंगाने प्रभाग २०मध्ये भव्य प्रचार रॅली मंगळवारी (दि.५) काढण्यात आली होती. या रॅलीत तरुणांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

महायुतीतील भाजपचे अधिकृत उमेदवार प्रशांत ठाकूर यांचा ग्रामीण भागात जोरदार प्रचार सुरू आहे. त्यानुसार प्रभाग २० मध्ये भव्य प्रचार रॅली काढून आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्यासाठी येत्या २० तारखेला कमळासमोरील बटन दाबून आपले मत देण्याचे आवाहन मतदारांना करण्यात येत आहे.





या प्रचार रॅलीवेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, प्रतिक बहिरा, गौरव कांडपीळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# दमदार पुनरागमन!

यापूर्वीच्या अध्यक्षीय निवडणुकीतील पराभवानंतर चार वर्षांनी, आता ७८ वर्षांचे असलेले डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या अध्यक्षांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या 'व्हाइट हाऊस'मध्ये दमदार पुनरागमन करत आहेत. अमेरिकन मतदारांनी प्रामुख्याने दोन मुद्यांवर ट्रम्प यांच्यावर विश्वास दाखवला आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि इमिग्रेशन हे ते दोन मुद्दे आहेत. यातला दुसरा मुद्दा भारताच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी ऐतिहासिक विजय मिळवला आहे. २०२० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीतील पराभवानंतर चार वर्षांनी ट्रम्प पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले आहेत. डेमोक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांचा या निवडणुकीत पराभव झाला. ट्रम्प यांना २७९ इलेक्टोरल मते मिळाली असून हॅरिस यांना २२३ इलेक्टोरल मते मिळाली आहेत. अमेरिकेत एकूण ५३८ इलेक्टोरल मते असून बहुमतासाठी २७० मते आवश्यक असतात. राजकारणात येण्यापूर्वी ट्रम्प हे एक सर्वपरिचित अब्जाधीश म्हणून ओळखले जात. 'न्यूयॉर्क रिअल इस्टेटचा बादशाह' असा लौकिक असलेले ट्रम्प २०१५-१६मध्ये पहिल्यांदा राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरले होते व विजयीही झाले. ट्रम्प यांचा राष्ट्राध्यक्ष पदाचा हा काळ वादग्रस्त ठरला होता व त्यानंतरच्या २०२० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत ते पराभूत झाले. अमेरिकेचे अध्यक्षपद हे जगातील सर्वश्रेष्ठ शक्तिमान पद मानले जाते व अमेरिकेतील निवडणूक निकालांचा परिणाम भारतासह संपूर्ण जगावर होतो. आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेची शक्ती अलीकडच्या काळात तुलनेने कमी झाली असली तरी जगातील सर्व आंतरराष्ट्रीय संस्थांवर आजही अमेरिकेचा दबदबा आहे. अमेरिकेची भारताबाबतची भूमिका नेमकी काय असेल हे भारताच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असते, परंतु गेली काही वर्षे अमेरिकेचा अध्यक्ष डेमोक्रॅटिक पक्षाचा असो वा रिपब्लिकन पक्षाचा अमेरिका-भारत संबंध उत्तमच राहिले आहेत. त्यामुळेच आताही हे संबंध पूर्वीप्रमाणेच राहतील अशीच अपेक्षा आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचे भारतासोबत जिव्हाळ्याचे संबंध असून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ते चांगले मित्र आहेत. स्वाभाविकपणे त्यांच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ट्रम्प यांच्या विजयासाठी भारतात अनेक ठिकाणी हवन-पूजा झालेली दिसली होती, परंतु ट्रम्प यांच्या विजयानंतर भारतातील आयटी उद्योगातील नोकऱ्या कमी होतील का हा मोठा प्रश्नही आहेच. ट्रम्प यांनी आपल्या मागील कार्यकाळात 'बाय अमेरिकन अँड हायर अमेरिकन' असा आदेश दिला होता. त्यांनी यावेळीही निवडणूक प्रचारादरम्यान इमिग्रेशन धोरणाबाबतचे मुद्दे उपस्थित केले. त्यांनी एच-१बी व्हिसा कार्यक्रम मर्यादित ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या पहिल्या कार्यकाळातही एच-१बी व्हिसा मिळवण्यात अडचणी वाढल्या होत्या. भारतीय आयटी व्यावसायिक अमेरिकेत काम करण्यासाठी या व्हिसावर अवलंबून असतात, परंतु ट्रम्प यांनी कॉर्पोरेट कर कमी करण्याचे संकेतही दिले आहेत. तो २१ टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आल्यास अमेरिकन कंपन्यांचा खर्च कमी होऊन ते बाहेरील लोकांना कामावर ठेवू शकतील. भारत-रशिया संबंध आणि चीनचे भारतासह जगासमोर असलेले आव्हान हे मुद्देही भारत-अमेरिका संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. चीनच्या बाबतीत ट्रम्प असो वा बायडन दोघांचेही धोरण अत्यंत कठोर राहिले होते. एकंदर भारताच्या दृष्टीने रिपब्लिकन पक्षाचे प्रशासन अधिक उपयोगी ठरल्याचे यापूर्वी दिसले आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांचे संबंधही दोन्ही देशांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत.**

# पोलादपूरमध्ये शहिद स्मृती स्तंभ उभारण्याची गरज





पोलादपूर तालुक्यातील तब्बल १४ शहिद जवानांच्या स्मृती चिरंतन करण्यासाठी पोलादपूर येथे मुंबई-गोवा नॅशनल हायवेलगत शहिदस्तंभ उभारण्याची आवश्यकता आहे. १५ वर्षांपूर्वी पोलादपूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये यासंदर्भात पत्रकार संघटनेमार्फत मांडलेल्या ठरावाकडे त्या ग्रामसभेतील अन्य वादग्रस्त विषयामुळे दूर्लक्ष झाले. त्यानंतरच्या पोलादपूर पंचायत समितीच्या आमसभेमध्ये याबाबतचा ठराव मांडण्यात यश मिळविले. अचानक पत्रकार संघटनेतील मतपरिवर्तनानंतर या शहिद स्मृती स्तंभाची मागणी त्याच संघटनेत नव्याने आलेल्या पत्रकारांनी त्यांच्या समाज संघटनांकडे मांडली आणि देशरक्षणासाठी शहिद झालेले जवान हे विविध समाजांचे असल्याने समाजाच्या सभागृहासोबत या शहिद स्मृती स्तंभाचेही भूमिपूजन होऊनही दोन्ही उपक्रम अद्याप रखडलेलेच आहेत.

दुसऱ्या महायुध्दातील पोलादपूर तालुक्यातील पहिले शहिद खडपी येथील सयाजी जाधव, कोंढवीचे अनाजी चव्हाण, भरत मोरे, लक्ष्मण निकम, चिखलीचे तानाजी बांदल, परसुलेचे बाबूराम जाधव, लोहारे पवारवाडीतील सुरेश भोसले, वाकण धामणेचीवाडीतील देऊ सकपाळ, पार्लेतील लक्ष्मण गमरे, तुर्भे खोंडा येथील गणपत पार्टे, आडावळे येरंडवाडीतील गणपत सालेकर, देवपूर येथील संदीप महाडीक, काटेतळीतील गणपत सकपाळ, पोलादपूरमधील राकेश सावंत अशा १४ शहिद जवानांचा उल्लेख विविध युध्दजन्य परिस्थितीत प्राणाची आहुती देऊन देशाच्या सीमावर्ती भागांचे रक्षण केल्याबद्दल भारतीय सेना दलाच्या विविध रेजिमेंटस् कडून केला गेला आहे. यामुळे पाच वर्षांपूर्वी पोलादपूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये या सर्व शहिद जवानांच्या स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी शहिद स्मृती स्तंभ उभारण्याकामी ग्रामपंचायतीने जागेसाठी पाठपुरावा करण्याची मागणी ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी केली होती, मात्र या ग्रामसभेमध्ये काही वादग्रस्त विषयांवरील वाद न्यायप्रविष्ठ होण्यापर्यंत चिघळून या मागणीकडे दुर्लक्ष झाले आहे.

नजिकच्या काळात मुंबई-गोवा नॅशनल हायवेच्या चौपदरीकरणाच्या कामास गती मिळून शहरातील हायवेवरील अनेक बांधकामे तोडली जाणार आहे. याच दरम्यान, ज्या कार्यालयांना अपुऱ्या जागेअभावी पर्यायी जागांमध्ये नव्याने इमारती उभाराव्या लागणार आहेत, अशा कार्यालयांच्या उर्वरित जागेमध्ये शहिद स्मृती स्तंभाची उभारणी शक्य होणार आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक शहिद जवान पोलादपूर तालुक्यातील असल्याने पंचायत समितीच्या आमसभेमध्ये याबाबतचा ठराव मंजूर झाल्यास त्यानुसार सर्वसमावेशक प्रयत्न होऊन कार्यवाही करण्यासाठी पत्रकारांची संघटना सक्रीय प्रयत्न करेल, अशी ग्वाही यावेळी पत्रकारांच्या संघटनेकडून वरिष्ठ पदाधिकारी व पत्रकार नेत्यांकडून देण्यात आली होती.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात काही वर्षांपासून कोणता समाज लोकसंख्येने मोठा याबाबत अहमहमिका सुरू असताना पोलादपूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर होऊन लगतच्या सडवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावात नायक मराठा भवनाच्या उभारणीसाठी तत्कालीन विधान परिषद सदस्य सुनील तटकरे यांनी लोकसभेचे उमेदवार म्हणून तीन कोटी रुपयांचा वैयक्तीक संबंधांतून निधी देण्याची घोषणा केली होती. यासोबतच पत्रकारांच्या संघटनेमध्ये नव्याने सहभागी झालेल्या पत्रकारांनी या भवनासोबतच शहिद स्मृती स्तंभाची उभारणी करण्यात येण्यासाठी समाजाकडे मागणी केली. त्यामुळे त्या लोकसभा निवडणुकीतील विद्यमान खासदार व उमेदवार अनंत गीते यांच्या हस्ते शहिद स्मृती स्तंभाचे भूमिपूजन करण्यात आले. या निवडणुकीमध्ये विधान परिषद सदस्य सुनील तटकरे यांचा पराभव झाला आणि नायक मराठा भवनासह शहिद स्तंभाचे काम रखडले.

यानंतर हे प्रयत्न पुन्हा सुरू होण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या माजी सैनिकांच्या मेळाव्यामध्ये शहिद स्मृती स्तंभाची मागणी करताना कोतवाल रेववाडीतील दिलीप शिंदे, देवपूरचे संदीप महाडीक, गोळेगणीतील सुरज मोरे आदींचा सेवाकाळात मृत्यू झाल्याच्या घटनांचा आढावा घेत आतापर्यंत पोलादपूर तालुक्यातील १८ जवान सेवा काळात युध्दजन्य अथवा सेवा बजाविताना देशाच्या कामी आल्याची माहिती देऊन शहिद स्मृती स्तंभाची मागणी लावून धरली.

पोलादपूर येथे पोलादपूर तालुका आजी माजी सैनिक सेवा कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून जेव्हा विश्रामगृहाची दुरूस्तीची मागणी करण्यात आली. तेव्हा नवीन सुसज्ज विश्रामगृह आणि पोलादपूर तालुक्यातील शहिद जवानांच्या स्मरणार्थ शहिदस्तंभ उभारण्याची पत्रकारांची अनेक वर्षांची मागणीदेखील आपण पूर्ण करणार असून पोलादपूर तालुक्याप्रमाणे माणगांव येथेही भरशहरामध्ये सैनिक कल्याणासाठी जमीन उपलब्ध असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसेच नगरविकास नगरविकास मंत्रालयाच्या माध्यमातून तेथेही आजी-माजी सैनिकांचे विश्रामगृह उभारणार असल्याचा निर्धार स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला, मात्र अलिकडेच पोलादपूर तालुका आजी माजी सैनिक सेवा कल्याणकारी संस्थेच्या विश्रामगृहाच्या नियोजित इमारतीसाठी दोन कोटींचा निधी उपलब्ध झाल्याची चर्चा होऊन या कामाचे भूमिपुजन रातोरात आचारसंहिता जारी होण्यापूर्वी करण्यात आले असता, या वेळी शहिद स्मृती स्तंभाचे सोयीस्कर विस्मरण झाले. त्यामुळे तब्बल १८ शहिद जवान तसेच पहिल्या, दुसऱ्या महायुध्दातील शहिद व बेपत्ता सैनिकांचे एकत्रित स्मारक उभारण्यासह आझाद हिंद सेना तसेच ब्रिटीश बॉईज कंपनीचे जवान यांच्या स्मृती जपण्याचे काम करण्याची गरज या शहिद स्मृती स्तंभाच्या माध्यमातून आवश्यक असल्याचे मत पत्रकार शैलेश पालकर यांनी व्यक्त केले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# अचूक माहितीसाठी ओपन एआयचे नवे सर्च इंजिन

ओपन एआयने नोव्हेंबर २०२२मध्ये चॅटजीपीटी जगासमोर आणले. या टूलने कमी कालावधीतच लोकप्रियता मिळवली आहे. एखाद्या शब्दाचा अर्थ शोधण्यापासून ते निबंध लिहिण्यापर्यंत चॅटजीपीटी खूप काही करू शकते. चॅटजीपीटी हे आर्टिफिशियल इंटेलिजेन्स टूल आहे. हे एक जनरेटिव प्री-ट्रेंड ट्रान्स्फॉर्मर भाषा मॉडेल असून ते एआयने विकसित केले आहे, जे तुम्हाला माणसाप्रमाणे उत्तरे देते. म्हणजेच गूगलसारखे एक दुसरे पोर्टल आहे, असे म्हणायला हरकत नाही.




आता ओपन एआयने नुकतीच त्यांची स्वतःची नवीन चॅटजीपीटी सर्च सर्व्हिस लॉँच केली आहे. एआय चॅटबॉट या वेबवर संबंधित माहिती शोधण्यासाठी एक नवीन मार्ग उपलब्ध करून देतो आहे. ओपन एआयनुसार चॅटजीपीटी आता इंटरनेट सर्चिंगमध्ये लक्षणीयरीत्या प्रोफिशियंट झाले आहे. ते युजर्सच्या प्रश्नांना लवकर आणि वेळेत उत्तरे देते. चॅटबॉटचा प्रॉम्प्ट-आधारित इंटरफेस आता तुम्हाला माहिती, डेटा शोधण्यास मदत करू शकणार आहे.

हे 'वेब सर्च' फीचर उचॅटजीपीटीच्या ऑफिशियल साईटवर, डेस्कटॉप पीसी, मोबाईल डिव्हाइससाठी अधिकृत प्सद्वारे उपलब्ध असेल. त्यात चॅटजीपीटी प्लस युजर्सना सध्या प्रवेश दिला जाईल आणि पुढील महिन्यात सर्व युजर्सना विनामूल्य प्रवेश दिला जाईल.

ओपनएआयने नमूद केले की, हा वेब सर्च पूर्वीसारखा उपयुक्त असेल. त्यामुळे अचूक माहिती शोधणे सोपे होणार असल्याचा दावा टेक कंपनीने केला आहे. चॅटजीपीटी सर्चसह युजर्सना यापुढे एकाधिक सर्च क्वेरी किंवा ब्राउझ लिंक करण्याची आवश्यकता नाही. त्यामध्ये बातम्या आणि ब्लॉगच्या लिंक्सचा समावेश आहे.

चॅटजीपीटीच्या शोध परिणामांमध्ये आता माहिती उजव्या बाजूस दिसेल. ओपनआयने सांगितले की, त्यांच्या शोध मॉडेलमध्ये चॅटजीपीटी ४ हे एक विशेष प्रकारचे टूल वापरण्यात आले आहे, जे नवीन 'सिंथेटिक' डेटा तंत्रांद्वारे प्रशिक्षित केले गेले आहे. हे शोध परिणाम काही अज्ञात तृतीय-पक्ष शोध पुरवठादार आणि उच्च गुणवत्तेचे कन्टेन्ट यांद्वारे सुधारित केले जातात आणि त्यामुळे अचूक माहिती मिळण्यास मदत होते.

# थोर स्वातंत्र्यसेनानी बिपिनचंद्र पाल



**निमित्त**

बिपिनचंद्र पाल भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर बंगाली नेते होते. त्यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८५८ रोजी उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात पॉइल (सिल्हेट जिल्हा) या गावी झाला. सध्या हा प्रदेश बांगलादेशात अंतर्भूत होतो. त्यांचे वडील रामचंद्र पाल हे जमीनदार व वकील होते. हळूहळू ते मुन्सफच्या जागेपर्यंत चढले. ते वैष्णवपंथी होते.

बिपिनचंद्रांची आई नारायणदेवी विशेष शिकलेल्या नव्हत्या, पण शिस्त व धार्मिक बाबी त्या कटाक्षाने पाळत. बिपिनचंद्रांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. त्यानंतर त्यांनी दोन मिशनरी व एका सरकारी माध्यमिक विद्यालयांतून इंग्रजी शिक्षण घेतले आणि कलकत्ता विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली (१८७४). पुढे ते प्रेसिडेन्सी महाविद्यालयात दाखल झाले पण दोन वेळा नापास झाल्यावर त्यांनी या औपचारिक शिक्षणास कायमचा रामराम ठोकला (१८७८). या सुमारास ते ब्राह्मोसमाजाकडे आकृष्ट झाले. त्याची अधिकृत दीक्षा त्यांनी नंतर घेतली. त्यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या वडिलांस फार दुःख झाले. बिपिनचंद्रांनीही अखेरीस आपला दुराग्रह सौम्य केला.

बिपिनचंद्रांचे एकूण आयुष्य कष्टमय होते. विद्यार्थिदशेतच त्यांनी विपुल वाचन केले. ब्राह्मोसमाजाचे केशवचंद्र सेन यांच्या विचारांची छाप त्यांच्यावर पडली. याशिवाय पी.के. रॉय. आनंदमोहन बोस, द्वारकानाथ गांगुली वगैरे विद्वानांचा प्रभाव त्यांच्यावर होता. कलकत्त्याच्या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून काही काळ त्यांनी काम केले. ग्रंथालयाचे ते चिटणीसही होते. हे सर्व करीत असताना ते काँग्रेसच्या अधिवेशनांना हजर राहत. त्यांनी आसाममधील चहाच्या मळ्यातील मजुरांचा प्रश्न धसास लावला (१८९६) आणि मुख्य आयुक्त हेन्रीग कॉटन याला त्यात लक्ष घालणे भाग पडले. बिपिनचंद्र धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी शिष्यवृत्ती घेऊन इंग्लंडला गेले, पण ही शिष्यवृत्ती त्यांनी एक वर्षातच सोडली व इंग्लंडमध्ये ते राजकीय कार्य करू लागले. तेथून ते प्रचारमोहिमेतून अमेरिकेला गेले. १९०१ साली ते भारतात परतले. भारतात आल्यानंतर न्यू इंडिया हे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. बंगालच्या फाळणीनंतर लोकमान्य टिळक व लाला लाजपतराय यांच्याबरोबर स्वदेशीच्या चतुःसुत्रीचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला. सारा बंगाल त्यांनी आपल्या व्याख्यानांनी जागृत केला. बहिष्कार व निःशस्त्र प्रतिकार यांचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी मद्रासलाही यांवर भाषणे दिली. त्यांनी वंदेमातरम् हे दैनिक सुरू केले (१९०६). त्यांनी अरविंद घोष यांना संपादक केले. यानंतर ते इंग्लंडला जाऊन राहिले (१९०८-११). या काळात एक नवीन विचार त्यांनी प्रसृत केला आणि भारत स्वयंशासित वसाहत म्हणून ब्रिटिशांना सहकार्य देईल, हे तत्त्व मांडले. या तत्त्वास एम्पायर-आयडिया हे नाव त्यांनी दिले. भारतात परत आल्यानंतर त्यांच्या एका लेखाबद्दल त्यांना एक महिन्याची शिक्षा झाली.

बिपिनचंद्र हे एक तत्त्वचिंतक होते. त्यांना देशाची सर्वांगीण तयारी झाल्याशिवाय स्वातंत्र्य नको होते. त्यांची राष्ट्रीयत्वाची कल्पना धर्मभावनांशी निगडित होती. ते होमरूल लीगचे सभासद होते. बिपिनचंद्रांनी अनेक वृत्तपत्रे काढली. वंदेमातरमसारखी जहाल वृत्तपत्रे अतिशय लोकप्रिय झाली. पहाडी आवाजाचे एक प्रभावी वक्ते म्हणून त्यांची ख्याती होती. लाल (लाला लजपतराय), बाल (बाळ गंगाधर टिळक) व पाल या त्रयीने वंगभंग, स्वदेशी व बहिष्काराचे प्रचंड आंदोलन करून जनजागृती केली. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील ते एक चिरप्रेरक पर्व आहे.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : दिवाळी संपली असली तरी मुलांच्या अद्याप सुट्ट्या बाकी आहेत. त्यामुळे सुट्ट्यांचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी पर्यटकांची पावले निसर्गरम्य दिवेआगरकडे वळली आहेत.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हार्ट अटॅक टाळण्यासाठी महिलांनी कराव्यात 'या' चाचण्या

असं म्हणतात की, हृदयविकाराचा धोका हा पुरुषांना जास्त असतो, पण जागतिक स्तरावर हृदयविकार हे महिलांच्या मृत्यूचे प्रमुख कारण ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, दीर्घकालीन धोका कमी करण्यासाठी महिलांनी वयाच्या विसाव्या वर्षापासून हृदयाच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. चार प्रमुख चाचण्या प्रत्येक स्त्रीने केल्या पाहिजेत.



**रक्तदाब तपासणे** : उच्च रक्तदाब हा हृदयरोग आणि स्ट्रोकसाठी धोकादायक आहे. उच्च रक्तदाबाची लक्षणे लवकर दिसत नाहीत. नवी दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलचे कार्डिओथोरॅसिक, हृदय व फुप्फुस पुनर्रोपण शस्त्रक्रियेचे वरिष्ठ सल्लागार डॉ. मुकेश गोयल सांगतात, वयाच्या विसाव्या वर्षापासून नियमित रक्तदाब तपासणी सुरू केली पाहिजे. वर्षातून एकदा रक्तदाब तपासणी आवश्यक आहे. उच्च रक्तदाबाची समस्या असलेल्या लोकांनी नियमित तपासणे करावी.

**कोलेस्ट्रॉल तपासणे** : शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे हृदयविकाराचा धोका टाळता येतो, कारण खराब कोलेस्ट्रॉल वाढल्याने रक्तवाहिन्यांमध्ये प्लेक तयार होतात व त्यामुळे हृदयविकाराचा झटका व स्ट्रोकचा धोका वाढतो. यथार्थ हॉस्पिटल्समधील कार्डिओलॉजीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. दीपंकर वत्स सांगतात, ज्या स्त्रियांना लठ्ठपणा किंवा हृदयविकाराशी संबंधित समस्या आहे, त्यांनी धोका लक्षात घेऊन वयाच्या विसाव्या वर्षापासून कोलेस्ट्रॉल तपासणी सुरू करणे गरजेचे आहे. एखाद्या व्यक्तीला कोणताही धोका नसेल, तर त्यांनी ही चाचणी वयाच्या ४५व्या वर्षी सुरू करावी आणि दर चार ते सहा वर्षांनी करत राहावी.

**रक्तातील ग्लुकोज तसापणी** : मधुमेह हा हृदयविकारासाठी पूरक आहे. मधुमेहाचा कौटुंबिक इतिहास असणाऱ्या लोकांना याचा धोका जास्त असतो. या चाचणीद्वारे मधुमेह किंवा इन्सुलिन रेझिस्टन्सची तपासणी वयाच्या विसाव्या वर्षी सुरू केली पाहिजे. कोणताही धोका नसेल, तर तुम्ही दर तीन वर्षांनी ही तपासणी करावी, तर खूप जास्त धोका असलेल्या लोकांनी वर्षातून एकदा ही चाचणी करणे आवश्यक आहे.

**बॉडी मास इंडेक्स** : व्यक्ती निरोगी आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी बॉडी मास इंडेक्स म्हणजेच उंची आणि वजनाची एक सोपी गणना केली जाते. डॉ. वत्स यांच्या मते, लठ्ठपणा हा हृदयविकारासाठी धोकादायक घटक आहे, जो उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल तसेच मधुमेहास कारणीभूत काहे. वयाच्या विसाव्या वर्षापासून बीएमआयच्या नियमित चाचणीमुळे लठ्ठपणासारखा समस्या ओळखता येतात.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या गावबैठकांना प्रचंड प्रतिसाद



**नागोठणे : बातमीदार**

विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या वतीने भाजपचे अधिकृत उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारार्थ नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघातील आमडोशी, वांगणी, बाळसई, कानसई, सुकेळी, हेदवली येथील गावबैठकांना प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघात केलेली विकासकामे पाहून रविशेठ पाटील यांचा विजय झालेलाच आहे फक्त शिक्का मोर्तब होणे बाकी आहे. आमदार रविशेठ पाटील यांचा प्रेमळ स्वभाव व त्यांनी प्रत्येक गावात केलेले विकासकामे त्यांची जमेची बाजू असून गावोगावी केलेले विकासकामे व महायुतीची ताकदीच्या जोरावर आमदार रविशेठ पाटील यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांनी नागोठणे जिल्हा परिषद मतदार संघात ठिकठिकाणी घेण्यात आलेल्या गावबैठकीत व्यक्त केला.

या प्रचार दौऱ्यात राष्ट्रवादीचे नेते शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, विलास चौलकर, भाजप नेते मारुती देवरे, अनंत वाघ, महादेव मोहिते, किशोरभाई म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, भाजप नागोठणे शहर सचिन मोदी, अध्यक्ष राष्ट्रवादी नागोठणे विभाग अध्यक्ष संतोषभाई कोळी, राजेंद्र शिंदे, भाजप नेते संतोष लाड, मधुकर हरपाल, शिवसेना शिंदे गटाचे नेते मनोहर सुटे, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे, अंकुश सुटे भाजप नागोठणे विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के, राष्ट्रवादी विभागीय कार्याध्यक्ष सचिन कळसकर, निवास पवार, प्रमोद जांबेकर, दिपेंद्र आवाद, सखाराम ताडकर, राजन दुबे, निमिष वाघमारे, विवेक रावकर, ॲड. गणेश जाधव, हरिश्चन्द्र तेलंगे, विठोबा माळी, अमित जांबेकर, प्रविण बडे, राजु जांबेकर, तिरत पोलसानी, प्रियांका पिंपळे, संज्योती लाड, सोनल पडवळे, वर्षा जांबेकर आदिंसह महायुतीचे बहुसंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# आमदार महेंद्र थोरवेंच्या प्रचाराला सुरुवात

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत सर्वच पक्षांचे उमेदवार जोरात प्रचाराला लागले आहेत. कर्जत-खालापूर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी देखील मंगळवारी (दि.५) महड येथील श्री क्षेत्र वरद विनायक मंदिरात गणरायाच्या चरणी नारळ वाढवून प्रचाराची सुरूवात केली.

या प्रवेळी प्रचाराला सुरूवात करताना जनतेशी संवाद साधत आपल्या कार्याची यादी मांडली. ते म्हणाले, मागील पाच वर्षांत कर्जत-खालापूरचे नंदनवन करण्यासाठी मी प्रयत्नानंची पराकाष्ठा केली आहे. मला जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा संधी मिळावी, अशी विनंती आहे. दुसऱ्या विकासपर्वासाठी निवडणुकीच्या मैदानात उतरतोय.शिवसेनेने पुन्हा उमेदवारी देत विश्वास दाखवला आहे. हा विश्वास मी नक्की सार्थ करेन. कर्जत-खालापूरकर नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत. आगामी निवडणुकीत शिवसेनेचाच भगवा फडकणार आहे आणि महायुतीचा विजय निश्चित आहे, असे आत्मविश्वासपूर्वक विधान केले.





महडच्या श्री वरद विनायकाच्या पवित्र स्थानी नारळ अर्पण करून प्रचाराचा शुभारंभ करताना गणरायाकडे सर्वसामान्य जनतेचे कल्याण आणि मतदारसंघाचा विकास घडवण्यासाठी आमदार थोरवे यांनी साकडे घातले.

# अलिबागमध्ये मतदान केंद्रांची निवडणूक निरीक्षकांकडून पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक (सामान्य) रुही खान यांनी मतदारसंघातील प्रमुख मतदान केंद्रे आणि निवडणूक संबंधित यंत्रणाना बुधवारी (दि.६) विस्तृत भेट दिली पाहणी केली आणि आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले.

आगामी निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेणे आणि सर्व व्यवस्था भारतीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतात याची खात्री करणे हा या भेटीचा उद्देश होता.

निवडणुकीसाठी मतदान केंद्र म्हणून निश्चित करण्यात आलेल्या सर्व शाळा, महाविद्यालय यांना त्यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी मतदारांसाठी उपलब्ध पायाभूत सोयी आणि सुविधांचा आढावा घेतला. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे व्यवस्था केली असल्याची खात्री करून घेतली. विशेषत: दिव्यांग मतदारांसाठी सुलभ व्यवस्थापन याची पाहणी केली. मतदान प्रक्रियेदरम्यान सुव्यवस्था राखण्यासाठी मतदारांसाठी सुरळीत प्रवेश, मार्गदर्शक सूचना, दिशादर्शक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती याबाबत त्यांनी माहिती घेतली. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील ज्या मतदान केंद्रावर ७५ टक्के पेक्षा जास्त मतदान होईल त्या बीएलओला विशेष सन्मानित करण्यात येईल असे रुही खान यांनी यावेळी जाहीर केले. तसेच निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी निःपक्षपाती आणि सतर्क रहावे, असेही स्पष्ट केले आहे.



# सुतारपाडामधील आदिवासी कुटुंबाला मिळणार घर



**कर्जत : प्रतिनिधी**

कळंब येथील सुतारपाडा येथे राहणारा आंबो कमळू पारधी हा तरुण मागील पंधरा वर्षांपासून आपल्या छोट्या मुलांसह मोडक्या झोपडीत जीवन जगत होता. सामाजिक कार्यकर्ते दीपक बोराडे यांनी या कुटुंबाची व्यथा जाणून जगासमोर आणली. आता मुंबई येथील इशार्जुन फाउंडेशनकडून घरकुल उपलब्ध करून दिले जाणार आहे.

आंबो कमळू पारधी यांच्या कुटुंबची माहिती समजल्यावर मुंबई येथील इशार्जुन फाउंडेशनच्या अध्यक्ष माधुरी बुधवानी यांनी सुतारपाडा येथे येऊन पारधी कुटुंबाबाचे कुडामेडीचे घर पहिले. त्यावेळी बुधवानी यांनी आपल्या संस्थेकडून पारधी कुटुंबाबाचे घराचे बांधकाम करून देण्याचे आश्वासन दीपक बोराडे यांना दिले होते. त्यानंतर सर्वत्र दिवाळी सण साजरा होत असताना इशार्जुन फाउंडेशन कडून आंबो पारधी यांच्या घराचे बांधकाम सुरू करण्यात आले. कल्याण येथील 'इशार्जुन फाउंडेशन' या सामाजिक संस्थेने तातडीने प्रतिसाद दिला. फाउंडेशनच्या अध्यक्षा माधुरी बुधराणी आणि त्यांचे सहकारी यांनी प्रत्यक्ष हजेरी लावून घराच्या कामाचा शुभारंभ केला.

इशार्जुन फाउंडेशन कडून सुतारपाडामधील आदिवासी कुटुंबाला घर बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जात आहे. त्यासाठी या संस्थेचे कार्यकर्ते दररोज कळंब जवळील सुतारपाडा येथे येणार आहेत.

# आमदार रविशेठ पाटील यांची रोह्यात पदाधिकारी, कार्यकर्ता भेट



**धाटाव : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे लोकप्रिय उमेदवार रविशेठ पाटील यांनी मंगळवारी (दि.५) रोहा तालुक्यातील मेढा, धामणसई, पडम, निडी, मालसई, पिगळसई, सोनगाव यासह अनेक गावात जाऊन कार्यकर्ते व पदाधिकारी यांची भेट घेतली.

या पेण विधानसभा क्षेत्रातील या सर्वच गावाचे माझ्यावर नितांत प्रेम आहे. गेल्या अनेक वर्षांपासून येथील जनतेशी ऋणानुबंध जुळले आहेत तसेच सर्वच मित्रपक्ष एकत्रित आले असल्यामुळे माझा विजय निश्चित आहे त्यामुळे येथील जनताच मला जवळपास एक लाखाहून अधिक मताधिक्यावर देऊन निवडून देईल, असा विश्वास या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

प्रत्येक गावागावात जाऊन प्रत्येक मतदारापर्यंत आमदार रविशेठ पाटील यांनी केलेला विकास कामाची माहिती देत आहोत. महायुतीचे सर्वच एक दिलाने प्रचार करीत आहोत त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत रवी शेठ पाटील यांना वयातून जास्तीत जास्त वेळ देऊ असा विश्वास त्यावेळी तालुकाध्यक्ष अमित घाग व्यक्त केला. या वेळी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मच्छीमार बांधवांनी मतदानाचा हक्क बजवावा'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील मच्छीमार सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांनी, नौका मालकांनी, नौकेच्या तांडेल, नौकेचे खलाशी, ओली व सुकी मासळी विक्री करणाऱ्या महिला-भगिनी, जाळे विणणारे मच्छीमार, हाताने मासे पकडणारे मच्छीमार, गावातील सर्व मत्स्यसंवर्धक व जलाशयात मासेमारी करणारे सर्व मच्छिमारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी किशन जावळे केले.



जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नितीन वाघवारे, सहायक आयुक्त, मस्त्यव्यवसाय संजय पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्याला १२२ किलोमिटरची सागरी किनारपट्टी लाभलेली आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्हा हा चांगल्या पर्जन्यमानाचा जिल्हा असल्यामुळे येथे गोड्या पाण्याची तळी, तलाव, जलाशय इत्यादी अस्तित्वात आहेत. मतदानाच्या दिवशी मतदान करुनच नौका मासेमारीसाठी समुद्रात नेण्यात यावी, त्याचप्रमाणे सागरी मासेमारी सफरीचे नियोजन करावे. मच्छीमारी हा रायगड जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय असून जिल्ह्यात चार हजार ५०० नौका आहेत. यामुळे २५ हजारपेक्षा जास्त लोकांना थेट रोजगार मिळत आहे. गावातील सागरी मासेमारीसाठी गेलेल्या नौका मतदानाच्या दिवशी बंदरात आणाव्यात जेणेकरून त्यावरील तांडेल, खलाशी इत्यादींना मतदान करता येईल. मतदानाची टक्केवारी वाढावी तसेच लोकशाही बळकट व्हावी, याकरिता सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा.

# भंडारी समाजाचा आमदार महेंद्र दळवी यांना पाठिंबा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील कुंभार वाडा व साळी वाडा परिसरातील कित्ते भंडारी समाज यांनी आमदार महेंद्र दळवी यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. पाठिंबा देण्याबाबतची विशेष सभा या भागातील कित्ते भंडारी समाजाचे अध्यक्ष मोहन करंदीकर यांच्या निवासस्थानी झाली.

सदरील सभेसाठी शिवसेनेचे पदाधिकारी याना आमंत्रित करण्यात आले होते. या भागात भंडारी समाजाची मोठी वस्ती असून आमदाराच्या विजयात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवणार आहेत. या वेळी शिवसेनेचे मुरुड शहर प्रमुख संदीप पाटील,भंडारी बोर्डिंगचे मुरुड तालुका अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, वीरेंद्र भगत,दर्शन काळबेरे, माजी नगरसेवक आशिष दिवेकर, माजी नगरसेवक गिरीश साळी आदी उपस्थित होत.



या वेळी या भागातील कित्ते भंडारी समाज अध्यक्ष मोहन करंदीकर यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी यांनी मुरूड शहरासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्यामुळेच मुरूड शहराच्या विकासासाठी मोठा निधी प्राप्त झाला आहे. आम्ही दिलेला पाठिंबा हा बिनशर्त असून त्यांच्या कार्यप्रणालीवर मोहित होऊन एकतर्फी पाठिंबा जाहीर केल्याची माहिती या वेळी त्यांनी दिली. या कार्यक्रमास या भागातील विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उतेखोल शाळेत मतदान जनजागृती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद शाळा उतेखोल या ठिकाणी तहसीलदार दशरथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजवावा, असा बॅनर लावून संदेश देण्यात आला.

राज्यातील विधानसभेच्या निवडणूक जाहीर झाल्या असून श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निवडणूक येत्या २० नोव्हेंबर रोजी होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने मतदानासाठी जनजागृती म्हणून माणगाव तालुका प्रशासन सज्ज झाला आहे. तुमचं एक मत घडवेल देशाचं भविष्य असा संदेश माणगावत बॅनर लावून देण्यात येत आहे. राजिप शाळा उतेखोल या ठिकाणी अशाच प्रकारे मतदानासाठी बॅनर लावून मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे.



या वेळी माणगाव उतेखोल केंद्राचे केंद्र प्रमुख शंकर शिंदे, खर्डी बुद्रूक आदिवासीवाडी शाळेचे शिक्षक दिनेश खडतर, साधन व्यक्ती श्रेया डांगे, दीपाली तांडे, सोनाली तोडकर, ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय माणगाव ग्रंथपाल नम्रता जाधव आदी उपस्थित होते.

# थंडी, तापाचे रुग्ण वाढले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

थंडीचा हंगाम सुरू झालेला असतानाही उकाडा जाणवत आहे. दिवसा अति उष्ण, तर रात्री थोडेफार थंड असते. त्यामुळे नागरिकांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खोकला, थंडी आणि ताप यांचे मोठ्या संख्यने रुग्ण सध्या शहरात पाहायला मिळत आहेत.

अशा बदलत्या वातावरणामध्ये व्हायरल संसर्गाचे प्रमाण अधिक आहे. त्यामध्ये काही प्रमाणात वातावरणात प्रदूषण असल्यामुळे या सर्व गोष्टींचा नागरिकांच्या आरोग्यावर चांगलाच परिणाम होत आहे. या सगळ्या प्रकारामुळे खोकला, थंडी आणि ताप यांचे मोठ्या संख्यने रुग्ण सध्या शहरात पाहायला मिळत आहेत.

दरम्यान, डॉक्टरांनी या वातावरणामध्ये विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. गरज पाणी पिणे, हात स्वच्छ धुणे असे सांगितले आहे.

# 'आंबिया बहरातील फळ पिकांचे विमा संरक्षण करा'

**मुरूड : प्रतिनिधी**

आंबिया बहारामध्ये विविध हवामान धोक्यामुळे फळपीकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरीता कृषि विभागामार्फत पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे.

योजनेमध्ये सहभागाकरिता विमा पोर्टल १ ऑक्टोबर पासून सुरु झाले असून कमी किंवा जास्त तापमान, वेगाचा वारा, गारपीट व सापेक्ष आर्द्रता या हवामान धोक्यापासून निर्धारीत केलेल्या कालावधीत सहभागी होऊन फळबागांचे संरक्षण करा, असे आवाहन मनिषा भुजबळ (तालुका कृषी अधिकारी, मुरुड) यांनी केले आहे.

कोकण विभागामध्ये अधिसुचीत केलेल्या महसुल मंडळात आंबा व काजू पिकांच्या उत्पादनक्षम फळबागांना



(आंबा, काजू-५ वर्षे) विमा संरक्षण देण्यात येईल. कर्जदार शेतकरी व बिगरकर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक असेल. खातेदार शेतकरी व्यतिरिक्त कुळ व भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांनाही सदर योजना लागू राहतील.

एका शेतकऱ्यास अधिसूचित फळपिकांसाठी ४ हेक्टर क्षेत्रावर विमा नोंदणी करता येईल. कमीत कमी क्षेत्र ०.१० हेक्टर असावे. विमा अर्ज सोबत १) ७/१२ फळपीक नोंद असलेला २)८ अ ३) आधार कार्ड ४) बँक पासबुक ५) फळपीक लागवड स्वयंघोषणा पत्र ६) फळबागेचा geotagg केलेला फोटो विमा पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील.

ही योजना रायगड जिल्ह्यामध्ये युनिव्हर्सल सोम्पो कंपनी लि. मार्फत राबविण्यात येत आहे. फळपिक विमा योजनेमध्ये सहभागी होण्याची अंतिम मुदत आंबा पिकाकरीता ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत आहे. अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, वेगाचा वारा, गारपिट यांच्यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. आंबा फळपिकासाठी जास्त तापमान , कमी तापमान, अवेळी पाऊस व वेगाचा वारा या हवामान घटकांमुळे झालेल्या नुकसानीसाठी विमा संरक्षित रक्कम १,७०,००० रुपये असणार आहे.

## निवडक

### सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**पनवेल :** पायी घरी परत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून ते चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विजय लक्ष्मी नायर आणि गोपाल कृष्ण नायर हे खारघर येथे राहत असून ते सेक्टर २१, खारघर येथील दुकानात सामान घेण्यासाठी गेले होते. ते पायी घरी चालत जात असताना कल्पतरू हॉस्पिटलकडे जाणाऱ्या चौकात उभ्या असलेला इसमाने विजयालक्ष्मी नायर यांच्या गळ्यातील २४ ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचले आणि तो पळून गेला.

### बाचाबाचीमधून मारहाण

**पनवेल :** फटाके वाजवण्याचा कारणावरून झालेल्या बाचाबाची मध्ये लाथा बुक्क्याने मारहाण केल्याप्रकरणी ११ अनोळखी व्यक्तींविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विकासवाडी, देवद येथे राहणारे ४२ वर्षीय व्यक्ती हे पत्नीसह मोटरसायकल वरून घरी परत येत होते. ते त्रिमूर्ती शरण सोसायटी समोर आले असता एक मुलगा फटाके वाजवत होता. त्या फटाक्याची ठिणगी अंगावर आल्यामुळे फटाके हवेत उडू नको असे ते बोलले. या वेळी त्या मुलाने शिवीगाळ केली. त्या मुलाची आई तेथे आली आणि त्या दोघांत बाचाबाची झाली. या वेळी त्या महिलेने त्यांच्या पत्नीच्या कानाखाली मारली. दरम्यान, त्या ठिकाणी अनोळखी इसम जमा झाले आणि सात ते आठ जणांनी लाथाबुक्क्याने मारहाण करून डाव्या गालावर वीट मारली यात ते जखमी झाले आहेत.

# एनएमएमटीच्या महिला प्रवासी संख्येत वाढ

## तिकीट दरात ५० टक्के सवलतीचे महिलांकडून स्वागत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एनएमएमटी बसेस मध्ये सर्व महिलांना, तिकीट दरात पन्नास टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे महिलांना आता प्रवासात तिकिटाचे अर्धेच पैसे द्यावे लागत आहेत. याचा परिणाम म्हणजे एनएमएमटीच्या महिला प्रवाशांच्या संख्येत आता वाढ झाली आहे. या निर्णयापासून, दिवसाला सरासरी २३ हजार महिलां प्रवाशी वाढल्या आहेत.

एनएमएमटीची बस सेवा इतर बस सेवांच्या तुलनेत नेहनीच उजवी ठरली आहे. त्यामुळे प्रवाश्यांची या बस सेवेला नेहमीच पहिली पसंती राहिली आहे. सध्या तर साध्या तिकीट दरात ही वातानुकूलित बस मधून प्रवास करायला मिळत आहे. त्यामुळे या बसेसना प्रवाश्यांची चांगली पसंती मिळत आहे. त्यानुसार एनएमएमटी



परिवहनच्या या बसेस नवी मुंबई महापालिका हद्दी बाहेर चांगली सेवा देत आहे आणि त्यांना चांगला प्रतिसाद ही मिळत आहे.

नवी मुंबई हे २१ व्या शतकातील आधुनिक शहर म्हणून या शहराची एक वेगळी ओळख आहे. या शहरात कामासाठी बाहेर पडणाऱ्या, प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या ही जास्त आहे. यामुळे महिला साठी परिवहन उपक्रमाने खास तेजस्विनी ही खास महिला बससेवा ही सुरू केली आहे.

यापूर्वी महिलांच्या सन्मानार्थ एसटीच्या बसेसमध्ये महिलांना निम्म्या तिकीट दराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या योजनेलाही महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आलेला आहे. त्यानुसार नवी मुंबई महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमात ही महिलांना निम्म्या तिकीट दराची सुविधा १५ऑक्टोबर पासून सुरू करण्यात आली आहे. आणि तेव्हापासून एनएमएमटीच्या बसेस मधून प्रवास करणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढले आहे.

या पूर्वी एनएमएमटीच्या बसेस मधून दिवसाला सरासरी ६० हजार महिला प्रवाशी प्रवास करत होते, मात्र आत्ता ही संख्या ८३ हजारांच्या घरात आली आहे. दिवसाला सरासरी २३ हजार महिला प्रवाशी वाढल्या आहेत.

आधीच एनएमएमटी परिवहन सेवा तोटयात आहे. या तिकीट कपाती मुळे त्यात आणखीन भर पडली आहे. यामुळे दिवसाला सात ते आठ लाखांचा तोटा वाढला आहे, मात्र परिवहन सेवा नागरिकांना सुविधा देण्यासाठी आहे. नफा कमविणे हा परिवहन चा हेतू नसल्याचे एनएमएमटी प्रशासनाचे म्हणणे आहे. महिला प्रवाश्यांना तिकीट दरात ५० टक्के सूट लागू करण्यात आली आहे. तेव्हापासून महिला प्रवाश्यांची संख्या वाढली आहे. हे समाधानकारक आहे. यामुळे महिला प्रवाश्यांचा परिवहन सेवेवरील विश्वास स्पष्ट होत आहे.

> **मला नेरूळ ते उलवे हा प्रवास कामानिमित्त नेहमी करावा लागतो. यासाठी बस चे नियमित भाडे ३० रुपये लागत होते, मात्र आत्ता ते १५ रुपये झाले आहे. त्यामुळे प्रवास स्वस्त झाला आहे. त्यामुळे आत्ता बस ची वाट बघून एनएमएमटी बस मधूनच प्रवास करायला सुरुवात केली आहे.**
>
> **–रुपाली जाधव, प्रवासी महिला**

## सोन्याची चैन हातातून हिसकावली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोन्याची चैन हिसकावून नेल्याप्रकरणी एकाच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकाश शर्मा हे पनवेल आनंदनगर येथे राहत असून ते एमजी रोड टपाल नाका येथे किरण ज्वेलर्स येथे नोकरी करतात. पाच महिन्यांपूर्वी रवी घुले (राहणार करंजाडे) हा दुकानात आला आणि वजन काटा व ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असल्याचे सांगितले. यावेळी दहा ग्राम सोन्याची चैन बनवण्याची ऑर्डर देऊन दोन चार दिवसांनी पैसे देऊन चैन घेऊन गेला. त्यानंतर दर महिन्याला तो सोन्याचा भाव काय आहे असे फोनवरून विचारायचा. रवी घुले यांनी तीन तोळ्यापर्यंत सोन्याची चैनच्या डिझाईनचे फोटो व्हॉट्सअ‍ॅप वर पाठवण्यास सांगितले. ते फोटो पाठवले. त्यानंतर तीन नोव्हेंबर रोजी सुनील सुखवाल व मनीष शर्मा हे दुकानात कस्टमर नसल्याने व्यवसायाबद्दल चर्चा करत होते. त्यावेळी रवी घुले दुकानात आला आणि त्याने पाठवलेल्या फोटो यातील सोन्याची चैन दाखवण्यास सांगितली. चार चेन दाखवले असता एक पसंत करून त्याने किमतीबाबत त्याच्या मामाला बोलायला सांगितले.

या वेळी घुले याच्या मामाने चेन तुमच्या माणसासोबत पाठवून द्या त्याच्याकडे एक लाख रुपये देतो आणि बाकीचे गुगल पे करतो असे सांगितले. यावेळी सुनील सुखवाल यांच्याकडे तीन तोळे वजनाची चैन आणि एक्टिवा गाडी दिली. ही गाडी रवी घुले चालवत व सुनील मागे बसून घेऊन गेले. काही वेळाने रवि घुले यांनी सुनील याच्या हातातील सोन्याच्या चेनची पिशवी हिसकावली आणि एक्टिवा गाडी घेऊन चिंचपाडा ब्रिज घालून कळंबोलीच्या दिशेने पळून गेला. पाठलाग केला असता ॲक्टिवा गाडी कळंबोली कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला लावलेली दिसून आली. रवी घुलेच्या मोबाईलवर फोन लावला असता फोन बंद येत होता. दोन लाख ३१ हजार रुपयांची चैन नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## महिलेची गळा आवळून हत्या; मृतदेह नाल्यात

**तुर्भेतील घटना; तपास सुरू**

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे एमआयडीसीतील रत्यालगतच्या नाल्यात एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. ओढणीने गळा आवळून महिलेची हत्या झाली आहे; मात्र ओळख पटलेली नाही. पोलिसांनी गुन्ह्याचा उलगडा करण्यासाठी आठ पथके तयार केली आहेत. इंदिरानगर ते महापे दरम्यानच्या

मार्गावर हा प्रकार घडला आहे. त्या ठिकाणी असलेल्या उघड्या नाल्यात मृतदेह पडलेला असल्याची माहिती पोलिसांना रविवारी संध्याकाळी मिळाली होती. त्यावरून तुर्भे एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जात मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला होता. अहवालात सदर महिलेची गळा दोन दिवस अगोदर हा मृतदेह त्या ठिकाणी टाकण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

घटनास्थळ व परिसरातील मागील तीन दिवसांच्या हालचालींचा तपास पोलिस करत आहेत. त्यासाठी स्थानिक पोलीस व गुन्हे शाखा यांची आठ पथके केली आहेत. त्याशिवाय बेपत्ता महिलांची माहिती घेण्यात येत आहे. आवळून हत्या झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून सोमवारी रात्री अज्ञात व्यक्तीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पैशांच्या वादातून तरुणाची हत्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पैशाच्या किरकोळ वादातून ३२ वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या केल्याप्रकरणी आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

बेलपाडा आदिवासीवाडी मागील डोंगरावर एका व्यक्तीचा मृतदेह पाण्यात पडला असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी पाहणी केली असता बाजूला आणि दगडावर रक्त पडलेले दिसत होते. मृतदेहाच्या शवविच्छेदनात त्याची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याची ओळख पटवली. या वेळी विकास रामलाल बोरा हा ३० ऑक्टोबर रोजी कमल या मित्रासोबत सीएसटी येथे जातो असे सांगून गेला व तो घरी परत न आल्याने नेहरूनगर पोलीस ठाणे, कुर्ला येथे तो हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. यानुसार पोलीस तपास करत असताना विकास बोरा याचा मित्र कमल ढोलपुरीया (ठक्कर बाप्पा कॉलनी, पाडा नंबर दोन, कुर्ला पूर्व) याला चौकशीसाठी ताब्यात घेतले व त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने पैशांच्या किरकोळ वादातून विकास बोरा याला दगडाने ठेचून मारले असल्याची कबुली दिली. आणि त्याचा मोबाईल फोन फेकून दिला.



**पनवेल : राजे शिवराय प्रतिष्ठान, पनवेल आयोजित दुर्गदर्शन सोहळा २०२४ ची मंगळवारी दीपोत्सव साजरा करून सांगता करण्यात आली. प्रथम महाराजांच्या चरणी व भवानी मातेच्या चरणी दिवा लावून पूजन करण्यात आले व शिववंदना घेऊन श्री पुरंदर गडावर दीप लावण्यात आले, तसेच श्री पुरंदर, धर्मवीर आणि परम पवित्र भगव्या ध्वजाची आकृती आकर्षक दिव्यांनी सजवण्यात आली. आज बाजूच्या परिसरातून असंख्य जण एक घर एक दिवा ह्या आव्हानातून अनेक दिवे घेऊन आलेले.**

## दुकानाच्या गल्ल्यातील पैशांची चोरी

**पनवेल :** दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेल्या पाच लाख ९८ हजारच्या रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. इस्माईल हजारी हे पनवेल येथे राहत असून त्यांचे गुजरात साडी सेल नावाचे भाजी मार्केट, पनवेल या ठिकाणी साडीचे दुकान आहे. दोन नोव्हेंबर रोजी त्यांचा मुलगा मोहम्मद हा सकाळी दुकानावर गेला असता दुकानात चोरी झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ते दुकानात आले आणि त्यांनी गल्ल्यात ठेवलेले आणि पेटीत ठेवलेले पैसे पाहिले असता ते दिसून आले नाहीत. एकूण पाच लाख ९७ हजारांची चोरी झाल्या प्रकरणी चोरा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मतदारांसाठी नो युअर पोलिंग स्टेशनची सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई अंतर्गत येणाऱ्या विधानसभा मतदारसंघातील मतदारांना त्यांचा मतदार यादीतील तपशील ईपीआयसी क्रमांक अथवा नावानुसार जाणून घेण्यासाठी व संबंधित मतदार संघातील मतदान केंद्राचा पत्ता व फोटो सहजरित्या पाहता यावा यासाठी नो युअर पोलिंग स्टेशन म्हणजेच जाणून घ्या आपल्या मतदान केंद्राचा तपशील व मार्ग या अंतर्गत २ क्यू आर कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

आपला मतदार यादीतील तपशील ईपीआयसी क्रमांक अथवा नावानुसार जाणून घेण्यासाठी हा पहिला क्युआर कोड स्कॅन करा. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर आपले नाव किंवा मतदान ओळखपत्राचा पर्याय निवडा. आपल्या नावाचा पर्याय निवडल्यास आपले नाव व आडनावाचे अचूक स्पेलिंग लिहा. मतदान ओळखपत्राचा पर्याय निवडला असल्यास ओळखपत्राचा ईपीआयसी क्रमांक अचूक लिहून क्लिक बटण दाबावे. स्क्रिनवर आपल्या मतदानाचा सर्व तपशील दिसेल.यानंतर आपला सर्व तपशील फोनच्या स्क्रिनवर उपलब्ध होईल. आवश्यक असल्यास कागदावर नोंदवून घ्या. यानंतर हा दुसरा क्यूआर कोड स्कॅन करा. त्यानंतर आपल्याला मतदार संघातील मतदान केंद्रांची लिंक दिसेल.सदर हायपर लिंकवर क्लिक केल्यावर आपल्याला मतदान केंद्राचा फोटो व मतदान केंद्राचा पत्ता दिसेल. तो कृपया कागदावर नोंदवून घ्यावा.त्यावर क्लिक केल्यानंतर डारेक्शन हे बटण दिसेल.

बटणावर क्लिक केल्यावर आपण गुगल मॅपच्या मार्फत मतदान केंद्रापर्यंत सहज पोहोचू शकता.हे दोन्ही क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर मतदान केंद्राचा सुसूत्रिकरणाचा कार्यक्रम जलद आणि सुसह्य होणार आहे.

# दिवाळीत एपीएमसी परिसराला वाहतूक कोंडीतून दिलासा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एपीएमसी वाहतूक पोलिसांनी यंदाच्या दिवाळीत एपीएमसी परिसरात वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याविषयीची विशेष मोहिम घेतल्यामुळे यंदा या परिसरात नागरिकांना वाहतूककोंडीतून काही प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्यामुळे या परिसरात खरेदीसाठी येणारे ग्राहक आणि दुकानदार यांनी देखील समाधान व्यक्त केले आहे. विशेष मोहिमेमध्ये जनप्रबोधन आणि कारवाईदेखील करण्यात आल्या.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दीपावलीच्या कालावधीत शहरांमध्ये ज्या–ज्या ठिकाणी खरेदी करिता मोठ्या प्रमाणात गर्दी होते, त्या परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूमी ही मोहीम राबवण्यात आली होती. दरम्यान, या कालावधीमध्ये डबल पार्किंग आणि नो पार्किंग या वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १ हजार ४४२ वाहन चालकांवर कारवाई देखील करण्यात आली. या कारवाईमध्ये १२ लाख ७७ हजार रुपये दंड आकारण्यात आला. तसेच दोन लाख ७८ हजार ४५०



रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी दिली.

आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणजे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची पाचही मार्केट एपीएमसी परिसरामध्ये आहे. त्यामुळे या बाजारपेठांना लागणारे अन्य उत्पादने तसेच या बाजारपेठांमध्ये खरेदी करीता येणाऱ्या ग्राहकांना गृहउपयोगी अन्य साहित्य देखील बाजारपेठेच्या जवळच उपलब्ध व्हावे यासाठी या परिसरात माथाडी भवन ते जलाराम मार्केटपर्यंत विविध प्रकारची गृहोपयोगी वस्तूंची उत्पादने दुकाने या परिसरात मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे सणांच्या कालावधीत या परिसरात खरेदी करता येणाऱ्या ग्राहकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असते. नवी मुंबई परिसरातून स्वतःच्या खासगी वाहनाने येत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी देखील होत असते. त्यानुसार एपीएमसी वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बळीराम घंटे यांनी माथाडी भवन ते जलाराम मार्केट पर्यंतच्या सर्व व्यापाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन केले.

परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी व्यापारांनी त्यांच्या मालाचे वाहने इमारतीतील दुकानाच्या मागील बाजूस खाली करावी किंवा रात्रीच्या वेळी माल खाली करून दिवसा दुकानासमोरील रस्ते मोकळे ठेवावे अशी सूचना केली. नवी मुंबई वाहतूक पोलीस विभागाकडून या विशेष मोहिमेकरिता एपीएमसी वाहतूक विभागाला अतिरिक्त कर्मचारी देखील उपलब्ध करून देण्यात आले होते.

वाहतूक कोंडीचे ठिकाणे लक्षात घेऊन दक्षता चौक येथे तीन कर्मचारी ते माथाडी सिग्नल येथे तीन कर्मचारी तसेच दक्षता चौक ते माथाडी सिग्नल पर्यंत पेट्रोलिंगसाठी तीन कर्मचारी सकाळपासून रात्री १० ते ११ वाजेपर्यंत कार्यरत होते. त्याच बरोबर पामबीच, एपीएमसी, सत्रा प्लाझा आदी वर्दळीच्या ठिकाणीदेखील कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. परिणामी यंदा पामबीच मार्ग आणि एपीएमसी परिसरात वाहतूककोंडीतून नागरिकांना दिलासा मिळाला होता.

## जेएनपीएच्या माल हाताळणीमध्ये वाढ

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जनेप प्राधिकरण) – ऑक्टोबर २०२४ मध्ये ६१४,६५१ टीईयूएस कंटेनर हाताळले जे ऑक्टोबर २०२३ मधील कंटेनर हाताळणीच्या तुलनेत ११.८६% ने जास्त आहे. जनेप प्राधिकरणाने एप्रिल २०२४ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत ४,१४२,१३४ टीईयूएस कंटेनर हाताळले जे मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत १३.१२% ने जास्त आहे.

ऑक्टोबर–२०२४ मध्ये ६१४,६५१ टीईयूएस कंटेनर आणि ७.६२ दशलक्ष टन एकूण माल हाताळला, जो ऑक्टोबर–२०२३ मधील रहदारीच्या तुलनेत अनुक्रमे ११.८६% आणि २.२६%, ने जास्त आहे. २) ऑक्टोबर–२०२४ मध्ये, जनेप प्राधिकरणाने ५६२ कंटेनर रेक आणि ८८,२२४ टीईयूएस हाताळले जे मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ५५५ रेक आणि ८८,४१२ टीइयुएस हाताळले होते.

एप्रिल–२०२४ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत ४,१४२,१३४ टीइयुएस कंटेनर आणि एकूण ५२.४२ दशलक्ष टन माल हाताळला, जो मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे १३.१२% आणि ५.५९% ने जास्त आहे. २) एप्रिल–२०२४ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत, जनेप प्राधिकरणाने मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ३,७८८ रेक आणि ६०१,८८९ टीईयूएसच्या तुलनेत ३,६८१ कंटेनर रेक आणि ५८८,१०७ टीईयूएस हाताळले. जनेप प्राधिकरणाची सातत्यपूर्ण वाढ आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत असून त्याच्या सर्व टर्मिनल्सचे कार्यक्षम कार्य प्रतिबिंबित करते. शाश्वत एंड–टू–एंड लॉजिस्टिक सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा उद्देश चालू उपक्रमांद्वारे क्षेत्रासाठी अखंड इएमआयएम अनुभव सुनिश्चित करणे आहे.





**खारघर : महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रभाग क्रमांक ४ येथील रघुनाथ विहारमध्ये प्रचार करण्यात आला. या वेळी गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील आदींसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# लोकशाहीच्या उत्सवासाठी प्रशासन सज्ज

## ■ कर्जत विधानसभा मतदारसंघात ३६२ मतदान केंद्र

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळीनंतर लोकशाहीचा मोठा सण विधानसभेच्या निवडणुका १५ दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. रायगड जिल्ह्यात सात विधानसभा मतदारसंघात प्रशासनाकडून पूर्णपणे नियोजन झाले आहे. निवडणूक रिंगणात कोण प्रतिस्पर्धी असतील याचे चित्र स्पष्ट झाले असून प्रचाराचा धुरळा उडण्यास सुरुवात झाली आहे.

मतदारसंघात एकूण ३६२ मतदान केंद्र असून एक हजार ९३४ कर्मचारी आवश्यक आहेत. या मतदारसंघांसाठी एक हजार ९६१ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

२०१९च्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या दोन लाख ८२ हजार ३१० एवढी होती. २०२४च्या निवडणुकीत यामध्ये ३६ हजार ४३२ नवमतदारांची वाढ झाली आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघात तीन लाख १८ हजार ७४२ मतदार आहेत. त्यापैकी एक लाख ५९ हजार २९३ पुरुष मतदार, एक लाख ५९ हजार ४४६ स्त्री मतदार असून इतर तीन संख्या आहे.

१८ ते १९ वर्षे दरम्यान असलेले मतदार सात हजार ९७३ इतके आहेत. यामध्ये पुरुष चार हजार ५६३ तर स्त्री मतदार तीन हजार४०९ इतके आहेत व इतर एक आहे. दिव्यांग मतदारांची संख्या एक हजार १६२ इतकी आहे. यामध्ये पुरुष ६५८ तर स्त्री मतदार ५०४ आहेत. अनिवासी मतदारसंख्या १४ इतकी असून यामध्ये १२ पुरुष व दोन स्त्री आहेत. ८५ अधिक वयोमन असलेल्या मतदारांची संख्या सहा हजार ५४० इतकी आहे. यामध्ये दोन हजार ८४७ पुरुष आणि तीन हजार ६९३ स्त्री मतदार आहेत. सैन्यदलातील मतदारसंख्या ६६ इतकी आहे.



कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण १३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी चार उमेदवारांनी माघार घेतली असून आता नऊ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. कर्जत विधानसभा मतदारसंघाचा खालापूर तालुकादेखील भाग असल्याने दोन्ही तालुक्यात मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.

### वाहन व्यवस्थापन

जिल्हास्तरावर तसेच विधानसभा मतदारसंघनिहाय वाहन व्यवस्थापनासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर कर्मचारी ने-आण करण्यासाठी व इतर निवडणूक विषयक कामकाजासाठी वाहने भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत, तसेच सर्व आवश्यक वाहनांवर GPS सुविधा लावण्यात येणार आहेत. एसटी बससंख्या ५१ मिनीबस संख्या २० आणि जीप ३१ तैनात करण्यात आल्या आहेत.

### ■ अशी रंगणार लढत

१) महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना),
२) नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना उबाठा),
३) श्रीराम बळीराम महाडिक (बसपा),
४) जाविद आकदस खोत (अपक्ष),
५) महेंद्र लक्ष्मण थोरवे (अपक्ष),
६) विशाल विष्णू पाटील (अपक्ष),
७) सुधाकर परशुराम घारे (अपक्ष),
८) सुधाकर यादवराव घारे (अपक्ष),
९) सुधाकर शंकर घारे (अपक्ष).

# अलिबाग मतदारसंघात मतदानयंत्रांची दुसरी सरमिसळ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग विधानसभा मतदारसंघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक रुही खान यांच्या उपस्थितीत मतदानयंत्रांची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया मंगळवारी (दि.५) करण्यात आली.



अलिबाग निवडणूक निर्णय अधिकाय्यांच्या कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांसह विविध उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक रुही खान (सामान्य)यांनी उपस्थितांना अलिबाग विधानसभा मतदारसंघातील सरमिसळ प्रक्रियेसंदर्भात माहिती दिली. अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३७५ मतदान केंद्र असून याकरिता ४५० बॅलेट यूनिट, ४५० कंट्रोल युनिट तर ४८७ व्हिव्हिपॅटचे वाटप करण्यात आले आहे. या मशीनचे सर्व मतदान केंद्रांना वाटप करण्यात आले.



**श्रीवर्धन : समुद्राच्या उसळलेल्या उंचच उंच लाटांवर जेट्स्की राईडचा थरार अनुभवणे प्रत्येकाला आवडते. अशीच जेट्स्की राईड दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे.** (छाया : अमेय नाझरे)

# आगरदांडा जेटीवरून टेम्पो थेट समुद्रात

**मुरूड : प्रतिनिधी**

आगरदांडा येथील जंगल जेटीवर बुधवारी (दि.६) सकाळी ८ वा.च्या सुमारास फेरीबोटीने दिघीकडे जाण्यासाठी आलेला पिकअप टेम्पो तीव्र उतारामुळे नियंत्रण सुटून जेटीवरून थेट समुद्रात कोसळला.



शहरातील मुसव्विर जमादार यांच्या मालकीचा टेम्पो (एमएच.०६ बीजी ०२४३) वरील चालक सफैअली सनावर सैयद हा पाण्याच्या बॉक्सनी भरलेला टेम्पो घेऊन दिघी येथे जाण्यासाठी आगरदांडा जेट्टीवर आला. जंगलजेटीत जाताना रिव्हर्स मारतेवेळी सफैअली सनावर सैयद याला अंदाज न आल्याने अचानक ब्रेक दाबल्याने चालकाचा ताबा सुटला आणि टेम्पो थेट खोल समुद्रात पलटी झाली.

आजूबाजूच्या नागरिकांनी त्वरीत टेम्पोचा दरवाजा उघडून सफैअली सनावर सैयदला किनाऱ्यावर आणले व ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. चालक व त्यांच्या सहकाऱ्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

# माणगावमध्ये पोलिसांचा रूटमार्च

**माणगाव : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संपूर्ण बाजारपेठ ते बस स्टँड येथे, निजामपूर, इंदापूर तसेच माणगाव पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी बुधवारी (दि.६) रूटमार्च काढला.

या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज भोसले, नरेंद्र बेलदार यांच्यासह सशस्त्र सीमा बल आसाम, आठ अधिकारी, ४४ जवान, तसेच दंगल नियंत्रण पथक, माणगाव २८ अंमलदार, माणगाव पोलीस ठाणे चार अधिकारी, १५ अंमलदारांनी रूटमार्चमध्ये सहभाग घेतला.



# महाड एसटी स्थानकात १७ खासगी बसेस

## बसचालक रजेवर गेल्याने प्रवाशांची गैरसोय

**महाड : रामप्रहर वृत्त**

एसटी. महामंडळाने प्रत्येक आगारात बसेसचा तुटवडा असल्याने खासगी तत्वावर एसटी बसेस प्रत्येक आगारात आणल्या असून या बसचे चालक ऐन दिवाळीच्या सिझनला रजेवर गेल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली आहे. याचबरोबर अचानक चालकाअभावी बस रद्द कराव्या लागत असल्याने प्रवाशांच्या रोषाला स्थानकात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.



दिवाळीच्या सणाला शाळा-कॉलेज व कार्यालयांना सुट्टी असल्याने एसटीने प्रवास करणार्या प्रवाशांच्या संख्येत आणि एसटीच्या उत्पन्नातही वाढ होत असते. सर्वच आगारात एसटी बसेसची कमी असणारी संख्या आणि त्यामुळे होणारी प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी महामंडळाने भाडे तत्वावर खासगी बसेस प्रत्येक आगाराला दिल्या आहेत. महाड एसटी स्थानकात अशा १७ खासगी बसेस आहेत. ठेकेदाराकडून या बसेसकरीता १७ चालक नेमण्यात आले आहेत. या १७ खासगी बसेसचे चालक ऐन दिवाळीच्या गर्दीच्या मोसमात रजेवर गेल्याने स्थानकातून दररोज नियमित सुटणाऱ्या लांब पल्ल्यांच्या गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले आहे. बुधवारी सकाळी ८ वा. सुटणारी पोलादपूर-बोरिवलीवरील चालक नसल्याने महाड-बोरीवली व पोलादपूर-बोरीवली अशा दोन गाड्यांतील प्रवाशांसाठी एकच बस सोडण्यात आल्याने आरक्षण केलेल्या प्रवाशांनी आपल्या बुकिंगची सीट मिळण्यासाठी गोंधळ घातला.

या दोन्ही गाड्यांतील प्रवाशांना त्यांच्या सीटवर अॅडजस्ट करताना वाहतूक नियंत्रक व वाहकांना तारेवरची कसरत करावी लागली.

# नागोठण्यात भाजप मध्यवर्ती कार्यालयाचे उद्‍घाटन

**नागोठणे : बातमीदार**


नागोठणे येथील शिवगणेश सभागृह येथे पेण-सुधागड विधानसभा मतदारसंघातील महायुतीतील भाजपचे अधिकृत उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचाराच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन महायुतीच्या नेत्यांच्या हस्ते करण्यात आले.



दरम्यान आमदार रविशेठ पाटील यांच्या पाठीशी नागोठणे परिसरातील मतदार ठामपणे उभे आहेत. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित असला तरी आपणच उमेदवार आहोत, अशा पद्धतीने आपण काम करायचे आहे. आमदार रविशेठ पाटील यांना जास्तीत जास्त मतदान कसे होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही निवडणूक रविशेठ पाटील यांची शेवटची निवडणूक आहे. त्यामुळे आपण जोमाने कामा लागू या, असे आवाहन उपस्थित कार्यकर्त्यांना महायुतीच्या नेतेगणांनी केले.

या वेळी नागोठणे जि. प. राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, दिलीप टके, शिवराम शिंदे, हरीश काळे, डॉ. राजेंद्र धात्रक, विलास चौलकर, प्रकाश जैन, भाजप नेते मारुती देवरे, किशोर म्हात्रे, राष्ट्रवादी नागोठणे शहराध्यक्ष बाळासाहेब टके, भाजप नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, श्रेया कुंटे, रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, राष्ट्रवादीचे नेते कृष्णा धामणे, भाजप नेते अनंत वाघ, अरिफ मनियार, जयराम पवार, शिवसेना नेते मनोज खांडेकर, भाजप नेते सिराज पानसरे, राजेंद्र लवटे, राष्ट्रवादी विभागीय कार्याध्यक्ष सचिन कळसकर, बिपीन सोष्टे, दिलीप शहासने, मनोज टके, सिद्धेश काळे, शिवसेना तालुका सचिव मंदार कोतवाल, विभाग अध्यक्ष प्रवीण ताडकर, शहरप्रमुख संतोष चितळकर, आकाश मढवी, कोंडीराम आखाडे, नितीन राजीवले, संजय कणघरे, विठोबा माळी, मोरेश्वर म्हात्रे, विवेक रावकर, तिरत पोलसानी, रामचंद्र दगडू देवरे, गणेश घाग, अमित खांबकर, रामचंद्र देवरे, निवृत्ती जंगले, नरेश देवरे, अॅड. रमेश जाधव, गौतम जैन प्रियांका पिंपळे, शितल नांगरे, मुग्धा गडकरी, सोनल पडवळे आदींसह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणगावात मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग







**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीसाठी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. १०० टक्के मतदान व्हावे यासाठी स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून या कार्यक्रमांतर्गत शाळांनी प्रभातफेरी, घोषवाक्य, रांगोळी स्पर्धा घेतल्या. सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्पपत्र व संदेशपत्र भरून दिले.



पळसगाव बुद्रुक केंद्रातील तेल्याचीवाडी या शाळेने मतदान जनजागृती फेरीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगितला. प्रभातफेरीच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व पटवून दिले. या वेळी मुख्याध्यापिका अनुसया ठाकरे, सहशिक्षिका कामिणी चांगण उपस्थित होत्या.

पळसगाव खुर्द आदिवासीवाडी या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली. सदर कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापक समिती मुख्याध्यापक राजेश पाबरेकर, सहशिक्षिका स्मिता पाबरेकर व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

पळसगाव बुद्रूक केंद्रातील खर्डी खुर्द शाळेच्या वतीने खर्डी खुर्द गावामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा प्रकाश पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावामध्ये प्रभातफेरी काढून जनजागृती केली. या वेळी विद्यार्थ्यांनी घोषवाक्य असलेले फलक हातात घेऊन जनजागृती केली. रांगोळी काढून त्यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजवावा, असा संदेश देऊन मतदानाचे महत्त्व पटवून दिले. उतेखोलवाडी शाळेतर्फेही प्रभातफेरी काढून जनजागृती करण्यात आली.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक व सुट्ट्या आल्याने मोठ्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले होते. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे पोलिसांनी आपली गस्त वाढवली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.५) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२१ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख चार हजार ८०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# मेंढ्या सांभाळताना मेंढपाळांना करावी लागते तारेवरची कसरत

**खोपोली : प्रतिनिधी**

मेंढपाळ आपल्या जवळ असेलेला लवाजामा घेऊन कोकणात येत असतात, मात्र मेंढ्या घेऊन येताना मेंढपाळांना तारेवरची कसरत करावी लागते. रस्त्यावर सातत्याने रहदारी, वाहने यापासून मेंढ्या सांभाळणे मोठ्या कष्टाचे होत आहे.

मेंढ्या ज्या शेतात बसल्या जातात त्यांच्या विष्ठेपासून शेतकऱ्यांच्या जमिनीला मोठ्या प्रमाणात फायदा होतो. शिवाय उत्तम पिक येत असते. यामुळे सध्या खालापूर, कर्जत, चौक अशा अनेक ग्रामीण भागात शेतकरी मेंढपाळांचे स्वागत करीत आहेत. भातशेती कापली की, कापलेल्या जागी नवीन गवत उगवते. हेच कोवळे गवत मेंढ्याचे खाद्य असते. पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढली असतात. या काटेरी वनस्पतींपासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो. शिवाय या खाद्यामुळे दूध व्यवसाय तेजीत चालतो.

सध्या कोकणामध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे हवे तसे खाद्य उपलब्ध होत नाही. शिवाय मेंढ्या आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे, मात्र असले तरी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या या व्यवसायाला खंड पडू नये यासाठी मेंढ्यापालन केले जात असल्याचे मेंढपाळांनी सांगितले.



# दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दौऱ्यासाठी टीम इंडिया सज्ज

## सूर्यकुमार यादव करणार भारताचे नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरूद्धच्या मायदेशातील कसोटी मालिकेत क्लीन स्वीपसह पराभूत झाल्यानंतर भारतीय संघ आता पुढील मिशनसाठी सज्ज झाला आहे. आता भारतीय संघाला दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जायचे आहे, जिथे ४ सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेत सूर्यकुमार यादव भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

सूर्याला टी-२० फॉरमॅटचा कायमस्वरूपी कर्णधार बनवण्यात आले आहे. दुसरीकडे गौतम गंभीरच्या जागी व्हीव्हीएस लक्ष्मण या टी-२० मालिकेत प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळताना दिसणार आहे. याचे कारण म्हणजे गंभीर न्यूझीलंड कसोटी मालिकेत व्यस्त होता. आता त्याला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जायचे आहे, जिथे ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे.



दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर भारतीय संघ ८ नोव्हेंबरला डर्बनमध्ये पहिला टी-२० सामना खेळणार आहे. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या दुसऱ्या टी-२० सामन्यासाठी संघ गाकेबरहा येथे जातील. त्यानंतर उर्वरित दोन सामने सेंच्युरियन (१३ नोव्हेंबर) आणि जोहान्सबर्ग (१५ नोव्हेंबर) येथे खेळवले जातील.

या टी-२० मालिकेसाठी मधल्या फळीतील फलंदाज रमणदीप सिंग आणि वेगवान गोलंदाज विजयकुमार वैशाक यांचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. या दोन्ही खेळाडूंना प्रथमच वरिष्ठ भारतीय संघात स्थान मिळाले आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल याचाही संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र वेगवान गोलंदाज मयांक यादव आणि अष्टपैलू शिवम दुबे दुखापतीमुळे संघात नाहीत. अष्टपैलू रियान परागही निवडीसाठी उपलब्ध नव्हता.

**भारतीय संघ :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार वैभव, आवेश खान आणि यश दयाल.


# आयपीएल २०२५च्या लिलावात पहिल्यांदाच इटलीचा क्रिकेटपटू

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी सर्व संघांनी रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. आता सर्व संघांना आणि खेळाडूंना मेगा लिलावाचे वेध लागले आहेत. यंदाचा लिलाव २४, २५ नोव्हेंबरला होणार आहे.

यंदा लिलावासाठी एकूण १५७४ खेळाडूंनी नोंदणी केली आहे. त्यात पहिल्यांदाच लिलावासाठी थॉमस जॅक ड्राका नावाच्या इटलीतील क्रिकेटरने नावनोंदणी केली असून त्याचे मुंबई इंडियन्सशी खास कनेक्शन आहे. साहजिकच लिलावात ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, इंग्लंड, विंडिज, न्यूझीलंड सारख्या संघांचे खेळाडू असतात, पण यंदा पहिल्यांदाच इटलीचा खेळाडू लिलावाचा भाग असणार आहे. काही महिन्यांपूर्वी इटालियन संघात सामील झालेला माजी ऑस्ट्रेलियन फलंदाज जो बर्न्स याने साऱ्यांचेच लक्ष वेधले. त्यानंतर आता थॉमस जॅक ड्राका या नावाची चर्चा रंगली असून तो लिलावाचा भाग असेल.

स्टारस्पोर्ट्सच्या रिपोर्टनुसार, थॉमस हा उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज आहे. २४



वर्षीय गोलंदाजाने यावर्षी इटलीकडून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून ४ टी-२० सामन्यामध्ये त्याने आठ गडी घेतले. थॉमसला फ्रँचायझी क्रिकेटचा अनुभवही आहे. तो कॅनडाच्या ग्लोबल टी-२० लीगमध्ये खेळला आहे. या लीगमध्ये ब्रॅम्प्टन वुल्व्हसकडून खेळताना त्याने एका हंगामात ६ सामन्यांत ११ बळी घेतले होते. थॉमस ड्राकाने ऑस्ट्रेलियातील पॉवर पेस क्रिकेट अकादमीमध्ये आपल्या वेगवान गोलंदाजीवर मेहनत घेतली आहे. त्याच्या गोलंदाजीवर अनेक फ्रँचायजींचे लक्ष आहे.

# राष्ट्रीय शालेय तायक्कांडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची पंचपदी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

६८वी राष्ट्रीय शाळेय तायक्कांडो स्पर्धा मध्य प्रदेश येथे ८ ते ११ नोव्हेंबरदरम्यान होत आहे. या स्पर्धेसाठी पंच म्हणून रायगडचे सुपुत्र, तायक्कांडो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्कांडो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे.

सुभाष पाटील हे ७वी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय ज्युनियर तायक्कांडो स्पर्धा दक्षिण कोरिया २००४ भारतीय संघाचे कोच, पंच पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा २०१० भारत, पंच कॉमनवेल्थ स्पर्धा २०११ आंतरराष्ट्रीय तायक्कांडो स्पर्धा दक्षिण कोरिया २०११ भारतीय संघाचे कोच, पंच ११वी इजराइल ओपन तायक्कांडो स्पर्धा २०१३ पंच ८वी स्कॉटिश ओपन स्पर्धा २०१३ स्कॉटलंड, संघप्रमख कोरिया ओपन २०१४, आंतरराष्ट्रीय सॅफ गेम २०१६, लुसोफोतीया तायक्कांडो स्पर्धा नियंत्रक २०१४ गोवा, कॅनडा ओपन व पैरा ओपन तायक्कांडो चॅम्पियनशिप २०१७ पंच २०२३ वर्ल्ड तायक्कांडो प्रेसिडंट कप व ओशियाना पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा तसेच आतापर्यंत अनेक स्पर्धा परिक्षा मध्ये सहभागी होऊन सुभाष पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



६८ वी राष्ट्रीय शाळेय तायक्कांडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील ८ नोव्हेंबर रोजी विदिशा एमपी येथे रवाना होत आहेत. त्यांना या स्पर्धेसाठी तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) व रायगड तायक्कांडो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व इतर मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

## जलज सक्सेनाने रणजी ट्रॉफीत घडवला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या रणजी ट्रॉफीचे सामने खेळवले जात आहेत. या सामन्यात केरळच्या जलाज सक्सेना मोठा इतिहास घडवला आहे. जलाज सक्सेना हा रणजी ट्रॉफीमध्ये सहा हजार धावा आणि ४०० विकेट्स घेणारा पहिला खेळाडू ठरला आहे. थुंबा येथे खेळवल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशविरूद्धच्या सामन्यात त्याने बुधवारी (दि.६) हा पराक्रम आपल्या नावे केला आहे.

जलाज सक्सेना रणजी क्रिकेटच्या इतिहासातील उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ठरला आहे. कोलकाता येथे मागील फेरीत सहा हजार धावांचा टप्पा त्याने गाठला होता आणि आता उत्तर प्रदेशविरुद्ध चौथी विकेट घेत त्याने या अनोख्या पराक्रमाची नोंद केली. ही त्याची रणजी ट्रॉफीतील ४००वी विकेट होती.

# आयसीसी कसोटी क्रमवारीत ऋषभ पंतने घेतली झेप

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरूद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दारूण पराभवानंतर आयसीसीने पुन्हा एकदा कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. दरम्यान, भारतीय संघाचा यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतला थोडा फायदा झाला आहे, तर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना दणका बसला आहे. दोन्ही स्टार आता टॉप १० पासून खूप लांब गेले आहेत.

आयसीसीने जाहीर केलेल्या कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा जो रूट अजूनही पहिल्या स्थानावर आहे. केन विल्यमसन दुसऱ्या क्रमांकावर असून त्याचे रेटिंग ८०४ आहे. इंग्लंडचा हॅरी ब्रूक आता ७७८ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.



यशस्वी जैस्वाल न्यूझीलंडविरूद्धच्या शेवटच्या कसोटीत काही विशेष करू शकला नाही, त्यामुळेच तो आता एका स्थानाने घसरून चौथ्या क्रमांकावर आला आहे, त्याचे रेटिंग आता ७७७ आहे. स्टीव्ह स्मिथ अजूनही ७५७च्या रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर आहे. ऋषभ पंतने मुंबई कसोटीत इतर फलंदाजांच्या तुलनेत सरस कामगिरी केली होती, त्याचाच फायदा त्याला या वेळी क्रमवारीत झाला. त्याने आता पाच स्थानांनी झेप घेत सहाव्या क्रमांकावर पोहचला आहे. त्याचे रेटिंग ७५० झाले आहे. या दोघांशिवाय भारताचा एकही फलंदाज टॉप १०मध्ये स्थान मिळवू शकलेला नाही.

विराट कोहलीबद्दल बोलायचे झाले तर, या वेळी तो एकूण ८ स्थानांनी खाली गेला आहे. त्याचे रेटिंग ६५५ पर्यंत घसरले असून तो २२ व्या क्रमांकावर आहे. रोहित शर्माबद्दल बोलायचे झाले तर तो थेट २६व्या क्रमांकावर गेला आहे. त्याचे रेटिंग सध्या ६२९ आहे. याचाच अर्थ आता या दोघांनाही टॉप १०मध्ये परतणे खूप कठीण जाणार आहे. किमान दोन मोठ्या डावांतच हे घडू शकते.

# ऑलिम्पिकसाठी भारताचा प्रस्ताव

## २०३६मधील स्पर्धांच्या आयोजनासाठी आयओसीला पत्र



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०३६च्या ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांच्या यजमानपदासाठी भारताने उत्सुकता दर्शवली असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) भविष्यातील यजमान ठरविणाऱ्या आयोगाला इरादा पत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) सादर करण्यात आले आहे.

२०३६च्या ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांच्या यजमानपदासाठी भारताने उत्सुकता दर्शवली असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) भविष्यातील यजमान ठरविणाऱ्या आयोगाला इरादापत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) सादर करण्यात आले आहे. भारतीय अधिकारी आणि आयओसीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून अनौपचारिक संवाद सुरू होता. अखेर भारताने यजमानपदाच्या दृष्टीने ठोस पाऊल उचलले आहे.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) १ ऑक्टोबर रोजी आयओसीला पत्र पाठविल्याचे क्रीडामंत्रालयाकडून सांगण्यात आले. भारतासाठी ही खूप मोठी संधी ठरू शकेल. आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि देशभरातील युवकांचे सक्षमीकरण यासाठी ऑलिम्पिक यजमानपदाचा फायदा होऊ शकेल.

# आयपीएल २०२५मध्ये 'या' खेळाडूंना डिमांड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धेच्या मेगा लिलावाचे बिगुल वाजला आहे. मेगा लिलावासाठी नाव नोंदवण्यात आलेल्या कित्येक खेळाडूंनी आपली बेस प्राईज २ कोटी रुपये इतकी ठेवली आहे. ईएसपीएन क्रीकइन्फोने दिलेल्या माहितीनुसार, भारताचे स्टार खेळाडू केएल राहुल, श्रेयस अय्यर आणि रिषभ पंत यांनी आपली बेस प्राईज २ कोटी रुपये ठेवली आहे.

श्रेयसने कोलकाता नाईट रायडर्सला गेल्या हंगामात चॅम्पियन बनवले होते, मात्र तरीही त्याला रिटेन करण्यात आलेले नाही, तर केएल राहुलला लखनऊने रिलीज केले आणि रिषभनेही दिल्लीची साथ सोडली आहे. या स्टार खेळाडूंसह आर. अश्विन, मोहम्मद शमी आणि युझवेंद्र चहल यांची बेस प्राईजदेखील २ कोटी रुपये असणार आहे. पृथ्वी शॉला दिल्ली कॅपिटल्सने रिलीज केलं आहे. त्याने आपली बेस प्राईज ७५ लाख रुपये ठेवली आहे.

**२ कोटी रुपये बेस प्राईज असलेले भारतीय खेळाडू**

रिषभ पंत, केएल राहुल, श्रेयस अय्यर, आर अश्विन, युझवेंद्र चहल, मोहम्मद शमी, खलील अहमद, दीपक चाहर, व्यंकटेश अय्यर, आवेश खान, ईशान किशन, मुकेश कुमार, भुवनेश्वर कुमार, क्रुणाल पंड्या, हर्षल पटेल, अर्शदीप सिंग, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकुर, मोहम्मद सिराज और उमेश यादव, प्रसिद्ध कृष्णा, टी नटराजन, देवदत्त पडिक्कल.

# टेबल टेनिसपटू हरमित देसाईला दुहेरी मुकुट

**कॅराकेस : वृत्तसंस्था**

येथे नुकत्याच झालेल्या २०२४च्या विश्व टेबल टेनिस फेडरेशनच्या फिडर कॅराकेस स्पर्धेत भारताचा टेबल टेनिसपटू हरमित देसाईने दुहेरी मुकुट संपादन केला. हरमितने या स्पर्धेत पुरुष एकेरीतील जेतेपद पटकाविले, तसेच त्याने मिश्र दुहेरीत कृत्विका रॉयसमवेत अजिंक्यपद मिळविले.

या स्पर्धेत हरमित देसाईची कामगिरी दर्जेदार झाली. मिश्र दुहेरीच्या अंतिम सामन्यात हरमित देसाई आणि कृत्विका यांनी क्युबाच्या जॉर्ज कांपोस आणि डॅनिला कॅरेझेना यांचा ८-११, ११-९, ११-८, ९-११, ११-५ अशा ३-२ सेट्समध्ये पराभव केला. हरमित आणि कृत्विका यांनी मिश्र दुहेरीच्या उपांत्य सामन्यात चीनच्या कैबो आणि झिन रेन यांचा पराभव केला. कृत्विका रॉयचे गेल्या दोन आठवड्यांच्या कालावधीतील हे दुसरे विजेतपद आहे. तिने कॅलिगेरी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत यशस्वीनी घोरपडेसमवेत महिला दुहेरीचे विजेतपद मिळविले होते.



फिडर कॅराकेस विश्व टेबल टेनिस स्पर्धेत भारताच्या मुदीत दानीचे मिश्र दुहेरीतील आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. मुदीत दानीने मिश्र दुहेरीत बुटमेलाच्या लुसिया कोरडेरोसमवेत आपला सहभाग दर्शविला होता. त्याचप्रमाणे एकेरीत कृत्विका रॉयला उपांत्यपूर्व फेरीतच पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत भारताच्या हरमित देसाईने फ्रान्सच्या जो सिप्रेडचा ११-७, ११-८, ११- ६ अशा ३-० सेट्समध्ये पराभव करत विजेतपद मिळविले.

# ४२ वर्षीय गोलंदाज आयपीएल ऑक्शनमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची टी-२० क्रिकेट लीग म्हणजेच आयपीएल ही जगातील सर्वात प्रसिद्ध क्रिकेट लीग आहे. आयपीएल मेगा लिलावासाठी ११६५ भारतीय खेळाडूंसह एकूण १५७४ क्रिकेटपटूंनी आपली नावे नोंदवली आहेत. यामध्ये ३२० कॅप्ड आणि १२२४ अनकॅप्ड खेळाडू आणि सहयोगी देशांतील ३० खेळाडूंचा समावेश आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे या लिलावासाठी एका दिग्गज गोलंदाजानेही आपले नाव दिले असून, तो ४२ वर्षांचा असून त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला आहे.



त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ९९१ विकेट घेतल्या आहेत. होय, जेम्स अँडरसनने आयपीएल लिलावात आपले नाव नोंदवले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ७००हून अधिक बळी घेणाऱ्या अँडरसनने यावर्षी जुलैमध्ये क्रिकेटला अलविदा केला. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच अँडरसनने टी-२० क्रिकेटमध्ये खेळण्याची इच्छा व्यक्त केली होती. तो म्हणाला होता की, मला अजूनही क्रिकेट खेळायचे आहे आणि टी-२० क्रिकेटमध्ये हात आजमावण्याचा विचार करत आहे आणि फ्रँचायझी क्रिकेटचा आनंद घ्यायचा आहे.

उल्लेखनीय आहे की, जेम्स अँडरसनने मेगा लिलावासाठी त्याची मूळ किंमत १.२५ कोटी रुपये ठेवली आहे. अँडरसनने १५ वर्षांपूर्वी २००९मध्ये इंग्लंडसाठी शेवटचा टी-२० सामना खेळला होता, तर टी-२० क्रिकेटमध्ये त्याचा शेवटचा सामना २०१४मध्ये खेळला होता.

## भारताचे ६७ वर्षीय 'आयर्नमॅन'

**अमेरिका : वृत्तसंस्था**

वयाच्या साठीनंतरही आयर्नमॅनच्या स्पर्धांमध्ये भारतीय तिरंगा फडकावणारे दशरथ जाधव हे एकमेव भारतीय ठरले आहेत. युनायटेड स्टेट्समधील कोणा येथे झालेल्या आयर्नमॅन वर्ल्ड चॅम्पियनशिप ही १७ तासांची स्पर्धा त्यांनी १६:००:२९ तासात पूर्ण केली आणि एक नवीन विक्रम प्रस्थापित केला.

दशरथ जाधव विशेषता म्हणजे त्यांचे मनोबल आणि आत्मशिस्त. ते म्हणतात, कुणाचे वय किती आहे, यावर कधीच अनुमान लावू नका, ध्येय गाठण्याची इच्छा असेल, तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते. त्यांच्या या विचारसरणीनेच त्यांना आयर्नमॅन स्पर्धेत जिंकण्याचे बळ दिले आहे.

# बंगळुरू बुल्सचा तामिळ थलैवाजवर विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

प्रो-कबड्डी लीग स्पर्धेतील येथील गच्चीबोली इनडोअर स्टेडियममध्ये खेळविण्यात आलेल्या सामन्यात बेंगळुरू बुल्सने तामिळ थलैवाजचा ३६-३२ अशा ४ गुणांच्या फरकाने पराभव केला. या स्पर्धेतील बेंगळुरू बुल्सचा हा दुसरा विजय आहे.

बेंगळुरू बुल्सच्या अजिंक्य पवार, अक्षित आणि सुरिंदर देहाल यांची कामगिरी दर्जेदार झाली. या तीन कबड्डी पटूंनी प्रत्येकी ५ गडी बाद केले. सामन्याला सुरुवात झाल्यानंतर दोन्ही संघांनी आक्रमक चढायांवर अधिक भर दिला. जय भगवानने बेंगळुरू बुल्सला आपल्या चढायांवर २ गुण मिळवून दिले. त्यानंतर तामिळ थलैवाजचा कर्णधार साहिल गुलियाने चोख प्रत्युत्तर दिले. पहिल्या टाईमआऊट अखेर दोन्ही संघ ७-७ असे बरोबरीत होते. नितीन रावलने आपल्या चढायांवर तामिळ थलैवाजला बरोबरी साधून दिली. सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांच्या बचावफळी भक्कम असल्याने आक्रमण करणाऱ्या रायडर्सना अधिक गुण मिळू शकले नाहीत. त्यामुळे मध्यंतरावेळी बेंगळुरू बुल्सने तामिळ थलैवाजवर १४-१३ अशा केवळ एका गुणाची आघाडी मिळवली होती.



सामन्याच्या उत्तरार्धात तामिळ थलैवाजच्या सचिन तनवरने आपल्या संघाला गुण मिळवून दिले. त्यानंतर तामिळ थलैवाने बेंगळुरू बुल्सचे सर्व गडी बाद करून आघाडी घेतली, पण त्यांना ही आघाडी अधिक वेळ राखता आली नाही. बेंगळुरू बुल्सने आपल्या डावपेचात बदल करीत पुन्हा हा सामना २३-२३ असा बरोबरीत ठेवला. तामिळ थलैवाजच्या अनुज गावडेने अजिंक्य पवारची पकड केल्याने तामिळ थलैवाजला २ गुणांची आघाडी मिळाली.

सामना संपण्यास ६ मिनिटे बाकी असताना अक्षितने काही महत्त्वाच्या चढायांवर तामिळ थलैवाजचे सर्व गडी बाद केल्याने बेंगळुरू बुल्सने ३ गुणांची आघाडी मिळवली. सामना संपण्यास २ मिनिटे बाकी असताना तामिळ थलैवाने आक्रमक चढाया केल्या पण त्यांना गुण मिळाले नाहीत. सुरिंदर देहालने आपल्या चढायांवर सुपर ५ गुण मिळवित बेंगळुरू बुल्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com